सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १३ ऑक्टोबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १८९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### पुन्हा एकदा आर्यन खान विरुद्ध समीर वानखेडे



नवी दिल्ली : आर्यन खान विरोधात झालेल्या चर्चित ड्रग्ज प्रकरणात तपास करणारे नारकोटीक्स कंट्रोल ब्युरोचे मुंबई विभागाचे माजी प्रमुख समीर वानखेडे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान दिग्दर्शित असलेल्या इरवी ऑफ बॉलीवुड या वेब सिरीजविरोधात त्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. Bads ऑफ बॉलीवुड ही सीरिज शाहरुख खानच्या रेड चिलीज एंटरटेनमेंट या प्रॉडक्शन हाऊसने तयार केली आहे. ही सीरिज नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाली आहे. या मालिकेत आपली प्रतिमा जाणूनबुजून मलिन करण्यात आली, तसेच काही दृश्यांमधून पोलिस अधिकाऱ्यांचा अपमान करण्यात आला असल्याचा आरोप समीर वानखेडे यांनी केला आहे. समीर वानखेडेंनी मानहानीचा खटला दाखल करत न्यायालयात दाद मागितली आहे.

### जम्मू - काश्मीर राज्यसभा निवडणुकीसाठी भाजपची उमेदवारांची यादी जाहीर

नवी दिल्ली, १२ ऑक्टोबर – भारतीय जनता पक्षाने जम्मू आणि काश्मीरमधील राज्यसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. रविवारी जाहीर झालेल्या यादीत तीन उमेदवारांचा समावेश आहे. गुलाम मोहम्मद मीर, राकेश महाजन आणि सत शर्मा. सत शर्मा सध्या जम्मू आणि काश्मीरमधील भाजपच्या राज्य युनिटचे प्रमुख आहेत. तिसऱ्या अधिसूचनेनुसार ते राज्यसभा निवडणूक लढवतील, जिथे भाजपला नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसच्या सत्ताधारी युतीवर संख्यात्मकदृष्ट्या आघाडी आहे. शर्मा ज्या जागेवर निवडणूक लढवतील त्या जागेवर भाजपकडे २८ मते आहेत, तर नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस युतीकडे २४ मते आहेत. या जागांसाठी २४ ऑक्टोबर रोजी निवडणूक होणार आहे.

### मतदानासाठी १२ पर्यायी ओळखपत्रे मंजूर



नवी दिल्ली : देशभरातील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने एक महत्त्वाचे निर्देश जारी केले आहेत. या निर्णयांतर्गत ज्या अंतर्गत मतदारांना मतदान करण्यासाठी १२ वेगवेगळ्या प्रकारच्या अधिकृत फोटो ओळखपत्रांचा वापर करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ज्या मतदारांकडे त्यांचे फोटो ओळखपत्र नाही किंवा त्यांचे ओळखपत्र हरवले आहे, अशा मतदारांसाठी निवडणूक आयोगाचा हा निर्णय दिलासादायक मानला जात आहे. निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार, जर मतदाराकडे मतदार ओळखपत्र नसेल तर पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक किंवा पोस्ट ऑफिस फोटो पासबुक, सरकारने जारी केलेले फोटो ओळखपत्र, पेन्शन दस्तऐवज, आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, सरकारी सेवा केंद्र स्मार्ट कार्ड, मनरेगा जॉब कार्ड किंवा मतदार यादीत सूचीबद्ध असलेले फोटो ओळखपत्र यांसारखे इतर वैध ओळखपत्र देखील मतदानासाठी वापरले जाऊ शकतात.

# निवडणुका स्वबळावर की महायुतीत, निर्णय जिल्हा पातळीवर - फडणवीस



मुंबई, १२ ऑक्टोबर : निवडणुका स्वबळावर लढायच्या की महायुतीत लढायच्या, हा निर्णय जिल्हा पातळीवर ठेवण्यात आला आहे. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाध्यक्षांवर निवडणूक लढण्याचा निर्णय सोपवण्यात आला आहे. पण असं करताना आपण महायुतीत आहोत, याचे भान ठेऊन लढावे. आपण जर वेगवेगळं लढलो तरी महायुतीतील मित्र पक्षांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्या, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या.

कोकण विभागातील पदाधिकाऱ्यांची बैठक शनिवारी मुंबईत पार पडली. यावेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांसह प्रमुख नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

आपण महायुतीत आहोत याचं भान ठेवा आणि टीका करा. नव्या लोकांचा प्रवेश करून घ्या, प्रवेश करून घेताना जुन्या लोकांनी त्यांना स्वीकारावे आणि संघटना वाढवावी, असं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

एक वेळ शिंदे चालतील, पण अजितदादांसोबत जाणं नको, अशी भूमिका पदाधिकाऱ्यांनी घेतली. मात्र काहीही झालं तरी महायुतीत लढायचं हा संदेश भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीचे मुख्य नेते देत आहेत.

# भारत - बांगलादेश सीमेवर २० किलो सोनं जप्त!



नवी दिल्ली : भारत - बांगलादेश सीमेलगत वाढत्या तस्करीच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सीमा सुरक्षा दल तैनात असून, त्यांनी पश्चिम बंगालमधील नादिया जिल्ह्यात मोठी कारवाई करत तब्बल २० किलो वजनाची सोन्याची बिस्किटे जप्त केली आहे. या कारवाईत एका भारतीय तस्कराला अटक करण्यात आली आहे. तस्कराची चौकशी सुरू आहे.

बीएसएफच्या ३२व्या बटालियनने ही यशस्वी कारवाई हरांदिपूर बीओपी परिसरात केली. दलाला मुस्लिमपारा गावातील एका भारतीयाने सोन्याची तस्करी होणार असल्याची माहिती दिली. बांगलादेशमधून २० किलो सोनं बेकायदेशीररत्या भारतात आणलं जात होतं. ठोस माहिती मिळताच सीमा सुरक्षा दलाने गस्त वाढवली आणि सावध राहून तस्कराला सोन्यासह पकडले.

शनिवारी सकाळी सहाच्या सुमारास, हरांदिपूर परिसरातील दाट बांबूच्या झाडांजवळ एक संशयास्पद व्यक्ती फिरताना जवानांना आढळली. जवानांनी तात्काळ त्या भागाला वेढा घालून संशयितास अटक केली. अटक केल्यानंतर झालेल्या झडतीदरम्यान त्या व्यक्तीकडून एक प्लास्टिकची पिशवी सापडली. पिशवी उघडली असता त्यामध्ये २० सोन्याची बिस्किट्स असल्याचे आढळले. या बिस्किट्सचे एकूण वजन सुमारे २० किलो असून, बाजारमूल्य अंदाजे २.८२ कोटी रुपये असल्याची माहिती अधिकृत निवेदनात देण्यात आली आहे. बीएसएफने अटक केलेल्या व्यक्तीस हरांदिपूर बीओपीमध्ये आणून प्राथमिक चौकशी केली. त्यानंतर आरोपीस आणि जप्त केलेलं सोनं संबंधित कस्टम विभाग व अन्य तपास यंत्रणांकडे सोपवण्यात आलं आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू असून, या तस्करीच्या जाळ्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही तपास केला जात आहे.

पश्चिम बंगालमधील भारत-बांगलादेश सीमेला लागून असलेल्या अनेक भागांमध्ये सोनं, ड्रग्स, गुटखा यांसारख्या वस्तूंची तस्करी मोठ्या प्रमाणावर होत असल्याचं वारंवार निदर्शनास आलं आहे.

# अफगाणिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांचा आग्रा दौरा रद्द



नवी दिल्ली , १२ ऑक्टोबर : अफगानिस्तानचे परराष्ट्र मंत्री मौलवी आमिर खान मुत्ताकी यांचा आग्र्याचा दौरा रद्द करण्यात आला आहे. डीसीपी सिटी सोनम कुमार यांनी माहिती दिली की, त्यांचा आग्र्यात येण्याचा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. त्यानंतर नवीन कार्यक्रमाबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

परराष्ट्र मंत्री मौलवी आमिर खान मुत्ताकी रविवारी सकाळी आग्र्यात येणार होते. त्यांच्या आग्र्याच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पोलिस आणि प्रशासन अत्यंत दक्षतेने तयारी करत होते. सहारनपूर येथील हिंसाचारानंतर अफगान परराष्ट्र मंत्र्यांच्या ताजमहाल भेटीदरम्यान सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली होती. मोठ्या प्रमाणावर पोलिस दल तैनात करण्यात आले होते.

शहरातील मुफ्ती मजीद रूमी यांच्या नेतृत्वाखाली मुस्लिम प्रतिनिधीमंडळाने अफगान परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली होती, मात्र प्रशासनाने कोणालाही भेटीची परवानगी दिली नव्हती. जिल्हा प्रशासनानुसार, रविवारी सकाळी ९ वाजता मौलवी आमिर खान मुत्ताकी देवबंदहून शिल्पग्राम

# चीनच्या सीमेसंदर्भात सतर्क राहणं अत्यंत आवश्यक - सीडीएस अनिल चौहान



देहरादून, १२ ऑक्टोबर : उत्तराखंडची सीमा जरी सध्या शांत असली, तरी चीनच्या सीमेसंदर्भात सतर्क राहणं अत्यंत आवश्यक आहे, असं चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) जनरल अनिल चौहान यांनी देहरादूनमध्ये आयोजित रॅली मध्ये सांगितलं. उत्तराखंड राज्याची चीनसोबत सुमारे ३५० किलोमीटर आणि नेपाळसोबत २७५ किलोमीटर लांब सीमा आहे. त्यामुळे हे राज्य सुरक्षेच्या दृष्टीने अतिसंवेदनशील आणि रणनीतीच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचं बनतं.

अनिल चौहान म्हणाले कि, भारत आणि चीनमधील काही सीमावर्ती भागांबाबत अजूनही मतभेद आहेत, आणि उत्तराखंडमधील बाड़ाहोती परिसरात पूर्वी अशा घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे सीमांची निगराणी आणि सतर्कतेबाबत कधीही हलगर्जीपणा होऊ नये. चौहान म्हणाले की, उत्तराखंडचा इतिहास अत्यंत गौरवशाली राहिलेला आहे. येथील नागरिकांनी देशाच्या सीमांच्या रक्षणासाठी सदैव योगदान दिलं आहे. चौहान यांनी सीमावर्ती भागांतील नागरिकांना देशाच्या सुरक्षेमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचं आवाहन केलं आहे. त्यांनी सांगितलं की, सीमेची सुरक्षा ही केवळ सैन्याची जबाबदारी नाही, तर स्थानिक नागरिकांची सतर्कताही तितकीच महत्त्वाची आहे.

सीमावर्ती भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना विशेषतः माजी सैनिकांना डोळे असे संबोधित करत त्यांनी म्हटलं की, जर हे लोक सतर्क राहिले, तर आपली सीमा अधिक मजबूत होईल. जनरल चौहान यांनी सांगितलं की, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश आणि लडाखमध्ये ज्या प्रकारे सहकारी संस्थांमार्फत सैन्याला अन्नधान्य पुरवलं जातं, तशीच एक व्यवस्था आता उत्तराखंडमध्येही लागू करण्यात येईल.

सध्या सहकारी समित्यांकडून दुग्धव्यवसाय व पशुपालनाशी संबंधित उत्पादने खरेदी केली जात आहेत, आणि भविष्यात त्यांच्याकडून ताजं रेशनही खरेदी केलं जाईल, असं त्यांनी स्पष्ट केलं. या उपक्रमामुळे सीमावर्ती भागांमध्ये अन्न व इतर वस्तूंचा नियमित आणि सुलभ पुरवठा सुनिश्चित होईल. स्थानिक लोकांना आर्थिकदृष्ट्या फायदा होईल. अशा प्रकारे, सैन्य आणि स्थानिक समाज यांच्यातील सहकार्य अधिक मजबूत होईल, आणि सीमावर्ती भागांचा सर्वांगीण विकास घडवून आणता येईल, असं जनरल चौहान यांनी स्पष्ट केलं.

### राज्यात १५ ऑक्टोबरपासून वादळी पावसाचा अंदाज

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून राज्यातील हवामान पूर्णपणे कोरडे आहे आणि नैऋत्य मान्सूनने राज्यातून निरोप घेतला आहे. मात्र १५ ऑक्टोबरपासून राज्यातील हवामानात परत एकदा बदल अपेक्षित आहे. या तारखेपासून किमान १८ ऑक्टोबरपर्यंत विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात ढगाळ हवामान आणि दुपारनंतरचा वादळी पाऊस अपेक्षित आहे. सध्याच्या अंदाजानुसार वादळी पावसाची सर्वात अधिक शक्यता आणि प्रमाण हे विदर्भ आणि मराठवाड्यात असू शकतं, जिथे या दरम्यान अनेक भागांमध्ये आभाळी हवामान अथवा वादळी पावसाची शक्यता राहील. तुलनेत खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात विखुरलेल्या स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो.

# अतिरेक्यांना पकडण्याची ती पद्धत चुकली, चिदंबरम यांचे धक्कादायक वक्तव्य



नवी दिल्ली : अतिरेकी भिंद्रनवाला आणि समर्थक शस्त्रसाठा घेऊन शिखांच्या पवित्र सुवर्ण मंदिरात लपले होते. या अतिरेक्यांना जीवंत अथवा मृत अवस्थेत पकडण्यासाठी ऑपरेशन ब्लू स्टार करण्यात आले. या ऑपरेशनविषयी बोलताना काँग्रेस नेते आणि देशाचे माजी गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी धक्कादायक वक्तव्य केले. अतिरेक्यांना पकडण्याची ती पद्धत चुकली, असे पी. चिदंबरम म्हणाले.

ऑपरेशन ब्लू स्टार तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या मंजुरीनंतर राबवण्यात आले होते. पण या ऑपरेशनद्वारे अतिरेक्यांना पकडण्याची पद्धत चुकीची होती, असे म्हणणाऱ्या चिदंबरम यांनी पुढे आणखी एक धक्कादायक वक्तव्य केले. ऑपरेशन ब्लू स्टार संदर्भातले निर्णय घेणारे राजकारणी, गुप्तचर आणि लष्करी अधिकारी असे सर्वजण चुकले. त्यांच्या चुकांचे परिणाम नंतर भोगावे लागले, असे पी. चिदंबरम म्हणाले. या चुकांमुळेच तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना जीव गमवावा लागला होता, असेही पी. चिदंबरम म्हणाले.

पी. चिदंबरम यांच्या या वक्तव्यांमुळे काँग्रेसचे नेतृत्व चिदंबरम यांच्यावर नाराज असल्याचे समजते. पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी असे भाष्य करणे बरोबर नाही या शब्दात काँग्रेसच्याच काही नेत्यांनी चिदंबरम यांच्या वक्तव्याबाबत नाराजी व्यक्त केली.

शनिवारी हिमाचल प्रदेशातील कसौली येथे झालेल्या खुशवंत सिंग लिटररी फेस्टिव्हलमध्ये चिदंबरम म्हणाले होते की, ऑपरेशन ब्लू स्टार ही एक चूक होती आणि पंतप्रधान इंदिरा गांधींना या चुकीसाठी आपला जीव गमवावा लागला.

भारतीय सैन्याने शीख धर्माच्या अतिशय पवित्र स्थळांपैकी एक असलेल्या सुवर्ण मंदिरावर कारवाई केली. या लष्करी मोहिमेत अकाल तख्ताचे मोठे नुकसान झाले, ज्यामुळे शीख समाजामध्ये तीव्र नाराजी आणि संताप उसळला.

ऑपरेशन ब्लू स्टार हा १ ते १० जून १९८४ दरम्यान अमृतसरमधील सुवर्ण मंदिरातून दमदमी टकसालचा प्रमुख भिंद्रनवाला आणि त्याच्या

# दिल्ली कसोटीत पहिल्या डावात वेस्ट इंडिजचा संघ २४८ धावांवर गारद



नवी दिल्ली, १२ ऑक्टोबर : भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळला जात आहे. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी वेस्ट इंडिजचा पहिला डाव २४८ धावांवर आटोपला. भारताने पहिल्या डावात २७० धावांची महत्त्वपूर्ण आघाडी घेतली आहे. वेस्ट इंडिजला ३१९ धावा करायच्या होत्या पण त्यांना फॉलो-ऑन टाळता आला नाही.

वेस्ट इंडिजने ४ बाद १४० धावांवर खेळ सुरू केला. वेस्ट इंडिजला पाचवा धक्का लवकर बसला. कुलदीप यादवने शाई होपला क्लीन बोल्ड केले. होपने ५७ चेंडूत ३६ धावा केल्या. त्यानंतर कुलदीपने आणखी दोन विकेट्स घेतल्या आणि संघाची धावासंख्या १६३ असताना टेविन इमलाचला एलबीडब्ल्यू केले. त्यानंतर जस्टिन ग्रीव्हज बाद झाला. टेविन २१ आणि जस्टिन १७ धावांवर बाद झाले. वेस्ट इंडिजने १७५ धावांवर आपली आठवी विकेट गमावली. मोहम्मद सिराजने जोमेल वॉरिकनला क्लीन बोल्ड केले. त्याने केवळ एक धाव घेतली.

लंचनंतर, जसप्रीत बुमराहने खरी पियरेला बाद केले, ज्यामुळे पाहुण्या संघाला नववी विकेट मिळाली. पियरेने २३ धावा केल्या. कुलदीप यादवने जेडेन सील्सला बाद करून वेस्ट इंडिजचा पहिला डाव २४८ धावांवर गुंडाळला. या विकेटसह कुलदीपने पाच विकेट्सही पूर्ण केल्या.

भारताने ५ बाद ५१८ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला होता. कर्णधार शुभमन गिलने नाबाद १२९ धावा करत त्याचे १० वे कसोटी शतक साकारले. यशस्वी जयस्वालने १७५ धावांची खेळी केली. जयस्वाल आणि गिल व्यतिरिक्त, साई सुदर्शनने ८७ धावा, ध्रुव जुरेलने ४४ धावा, नितीश कुमार रेड्डीने ४३ धावा आणि केएल राहुलने ३८ धावा केल्या. वेस्ट इंडिजकडून जोमेल वॉरिकनने पहिल्या डावात ३ आणि रोस्टन चेसने १ विकेट घेतली. भारत आणि वेस्ट इंडिजमधील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील हा दुसरा सामना आहे. पहिला सामना जिंकून भारतीय संघ मालिकेत १-० ने आघाडीवर आहे.

# चिनी वस्तूंवर १००% कर, ट्रम्प यांच्या निर्णयाचा चीनकडून निषेध



बीजिंग, १२ ऑक्टोबर : अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापार तणाव पुन्हा एकदा वाढला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनमधून येणाऱ्या वस्तूंवर १०० टक्के अतिरिक्त टॅरिफ (शुल्क) लावण्याची घोषणा केली आहे. यावर चीनने तीव्र प्रतिक्रिया देत हे 'दुहेरी निकष' आणि 'अन्यायकारक व्यापार वर्तन' असल्याचे म्हणत कडाडून निषेध व्यक्त केला आहे. ट्रम्प यांनी हा निर्णय चीनने 'रेअर अर्थ मिनरल्स' (दुर्मिळ खनिजे) च्या निर्यातीवर लादलेल्या कठोर निर्बंधांच्या प्रत्युत्तरात घेतला आहे.

चीनने स्पष्ट केले आहे की, त्यांच्याकडून लादण्यात आलेले निर्बंध वैध आहेत आणि जागतिक औद्योगिक आणि पुरवठा साखळीची सुरक्षा कायम ठेवण्यासाठी तो सर्व देशांशी संवाद आणि सहकार्य वाढवण्यास तयार आहे. दुसरीकडे, अमेरिकेने इशारा दिला आहे की परिस्थिती सुधारली नाही, तर याच महिन्यात अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत होणारी नियोजित बैठक रद्द केली जाऊ शकते.

चीनने आरोप केला आहे की, सप्टेंबरपासून अमेरिका चीनवर आर्थिक दबाव वाढवत आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या प्रवक्त्याने सांगितले, या उपायांनी चीनच्या हितसंपत्तींना गंभीर नुकसान पोहोचवले आहे आणि दोन्ही देशांमधील व्यापार चर्चा होण्याचे वातावरण बिघडवले आहे. मंत्रालयाने पुढे असेही म्हटले की, प्रत्येक टप्प्यावर उंच शुल्क लावण्याची धमकी देणे, हे चीनसोबत संवाद साधण्याचा योग्य मार्ग नाही. चीनने ट्रम्प प्रशासनाला आपल्या व्यापार नीतीत बदल करण्याचे आवाहन केले असून 'उच्च शुल्कांच्या धमक्यां'चा निषेध केला आहे.

चीनच्या प्रवक्त्याने पुढे इशारा दिला की, जर अमेरिका आपल्या चुकीच्या धोरणांवर ठाम राहिली, तर चीनही आपल्या वैध अधिकारांची आणि हितसंपत्त्यांची रक्षा करण्यासाठी ठोस पावले उचलेल. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले, चीनची भूमिका स्पष्ट आहे - आम्हाला व्यापार युद्ध नको आहे, पण आम्ही त्याला घाबरतही नाही. आम्ही अमेरिकेला विनंती करतो की त्यांनी आपली चुकीची धोरणे तात्काळ थांबवावीत.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर १००% अतिरिक्त टॅरिफ लावताना सांगितले की, चीनने रेअर अर्थ मिनरल्सवर घेतलेला निर्णय हा सर्व देशांना प्रभावित करेल. त्यांनी या निर्णयाला 'नैतिक अपमान' असे संबोधले आणि हे चीनच्या जागतिक व्यापारावर वर्चस्व मिळवण्याच्या दीर्घकालीन रणनीतीचा भाग असल्याचे सांगितले. ट्रम्प यांनी स्पष्ट केले की अमेरिका एकतर्फी कारवाई करेल, इतर देश काहीही करत असले तरी. त्यांनी घोषित केले की १ नोव्हेंबरपासून अमेरिका चीनवर १००% नवीन टॅरिफ लावेल, जे सध्या लागू असलेल्या कोणत्याही शुल्कांपेक्षा वेगळे आणि अधिक असतील.

# चीन सीमेजवळच्या भारतीय गावांचा झपाट्याने विकास



तवांग : चीन सीमेजवळच्या भारतीय गावांचा झपाट्याने विकास सुरू आहे. तवांग जिल्ह्यातील सीमेजवळच्या १५० गावांमध्ये केंद्र सरकारच्या व्हायब्रंट व्हिलेज योजनेंतर्गत पर्यटनाला चालना देण्यासाठी झपाट्याने विकास सुरू आहे. सर्व गावांमध्ये पक्के काँक्रीटचे रस्ते तयार करण्यात आले आहेत. गावात वीज पुरवठा २४ तास राहील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व गावांमध्ये डिजिटल सोयीसुविधा उपलब्ध आहेत.

तवांग जिल्ह्यात १४७ कोटी रुपये खर्चून एक कन्व्हेशन सेंटर अर्थात सांस्कृतिक केंद्र उभारण्यात आले आहे. या सेंटरचे उद्घाटन पंतप्रधान मोदींनी काही दिवसांपूर्वीच केले आहे. याआधी मोदींनी मागच्या वर्षीच सर्वाधिक उंचीवरील बोगद्याचे आणि रस्त्याचे उद्घाटन केले.

अरुणाचल प्रदेशमधील तवांग जिल्ह्यात फुटबॉल खेळण्यासाठी येणाऱ्यांची संख्या वाढली आहे. आयोजक विविध फुटबॉल स्पर्धांचे आयोजन करत आहे. या निमित्ताने तवांगमध्ये बाहेरुन येणाऱ्या पाहुण्यांची आणि पाहुण्या खेळाडूंची संख्या वाढत आहे. फुटबॉलच्या निमित्ताने तवांगमध्ये लहान मोठ्या व्यवसायांना चालना मिळू लागली आहे.


# ओळख : कपाशीतील मित्रकिडींची

कृषी माहिती

'जीवो जीवश्च: जीवम्' या युक्तीप्रमाणे एक सजीव दुसऱ्या सजीवावर उपजीविका करतो. आपल्या शेती परिसंस्थेत सुद्धा काही कीटक दुसऱ्या कीटकाच्या अंडी, अळी व कोष यावर उपजीविका करीत असतात, त्यांना परोपजीवी कीटक म्हणतात. प्रौढ परोपजीवी कीटक यजमान किडींच्या शरीरात किंवा शरीरावर अंडी घालतात. त्या अंड्यातून निघालेल्या अळ्या यजमान किडीचा विनाश करतात, तर काही कीटक दुसऱ्या किडींचे भक्षण करून उपजीविका करतात, ज्यांना भक्षक कीटक म्हणून ओळखल्या जाते. जैविक नियंत्रणासाठी उपयोगी असणारे निवडक परोपजीवी, भक्षक कीटक, जीवाणू आणि विषाणू प्रयोगशाळेत वाढवता येतात. क्रायसोपा व लेडीबर्ड बीटल यासारख्या भक्षक कीटकांचा, एच.ए.एन.पी.व्ही विषाणूचा व बीटी या जीवाणूचा वापर करून कपाशीतील नुकसानकारक कीड आटोक्यात आणता येते.


लेडीबर्डबीटल (ढाल किडा) अळी


क्रायसोपाची अळी


सिरफीड माशी


रेडयुव्हीड ढेकुण

**भक्षक कीटक**

**१) लेडीबर्डबीटल (ढाल किडा)** : लेडीबर्ड बीटल या किटकाचे प्रौढ भुंगे व त्यांच्या अळ्या प्रामुख्याने मावा किडीवर जगतात. लेडीबर्ड बीटलची अंडी रंगाने पिवळसर व आकाराने लांबुळकी असून, समूहामध्ये पण उभी घातलेली असतात. याची अळी ६ ते ७ मि. मी. लांब असून, रंगाने करडी व त्यावर पांढुरके ठिपके असतात. प्रौढ तुरीच्या दाण्यासारखे, पण खालून चपटे व वरून फुगीर असतात. प्रौढ रंगाने पिवळसर, बदामी किंवा लालसर असून, त्यांच्या समोरच्या पंखावर काळ्या रेषा किंवा ठिपके असतात. काही प्रजातीत ते नसतात. अळी प्रती दिवशी २५ मावा, तर प्रौढ भुंगा ५६ मावा खाऊ शकतो.

**२) क्रायसोपा** : क्रायसोपाची अळी मावा, तुडतुडे, पांढरी माशी तसेच बोंडअळ्यांची अंडी व त्याच्या लहान अळ्यांचे भक्षण करते. क्रायसोपाचा पतंग पोपटी, हिरव्या व निळसर झाक असलेला असतो. मादी पतंग कपाशीच्या पानावर किंवा देठावर एकएकटी अंडी घालते. अंडे हिरव्या रंगाची असून, पांढऱ्या तंतुच्या टोकावर राहते. या अंड्यातून ४८ तासांत अळी बाहेर पडते व भक्ष्याच्या शोधात फिरते. अळी अवस्था १५ ते २७ दिवसांची असते. क्रायसोपाची अंडी उपलब्ध असल्यास हेक्टरी १०,००० अंडी या प्रमाणात कपाशीच्या शेतात एकसारख्या प्रमाणात पीक ४० ते ४५ दिवसांचे झाल्यानंतर ३० दिवसांच्या अंतराने दोन वेळा सोडावीत.

**३) सिरफीड माशी** : ही सुद्धा मावा किडींचा महत्त्वाचा भक्षक कीटक आहे. सिरफीड माशीची अळी रंगाने हिरवट असून, तोंडाकडचा भाग टोकदार असतो. अळीला पाय नसतात. एक अळी दिवसभरात साधारणपणे १०० मावा खाऊ शकते. या किटकाची माशी घरात आढळणाऱ्या माशीसारखीच असून, तिच्या पाठीवर लाल पिवळे व काळे पट्टे असतात. माशीचे डोके लाल रंगाचे असते.

● चंचल गजानन दाढे
● स्वाती शिंदे
आचार्य पदवी विद्यार्थी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

**४) पेंटॅटोमिड ढेकूण** : पेंटॅटोमिड ढेकूण हे ढालीच्या आकाराचे, काळपट करड्या रंगाचे असून, कापूस पिकावर सर्वत्र पाहायला मिळतात. हे ढेकूण आपली सोंड अमेरिकन बोंडअळी, उंट अळी तसेच इतर अळ्यांच्या शरीरात खुपसतात व शरीरातील द्रव शोषून घेतात. परिणामी अळी मरते. ओरीअस ढेकूण हे छोटे काळपट रंगाचे असून, त्यांना सोंड असते. हे ढेकूण फुले तसेच पानांच्या बेचक्यात लपून बसतात. पिल्ले चकचकीत पिवळसर रंगाची असतात. तसेच प्रौढ व पिल्ले मावा, तुडतुडे, फुलकिडे, कोळी किडींची अंडी तसेच लहान अळ्या यामध्ये आपली सोंड खुपसून आतील द्रव शोषण करतात, त्यामुळे किडी मारतात.

**५) रेडयुव्हीड ढेकूण** : हा परभक्षी कीटक असून, किडीच्या शरीरामध्ये आपली सोंड टोचून रस शोषण करते व किडीला मारून टाकते.

**६) एन्थोकोरीड ढेकूण** : हा परभक्षी कीटक असून, स्वतःच्या सोंडेने मावा बोंडअळ्या या किटकाला मारून त्यातून रस शोषण करून उपजीविका करतात.

**७) कोळी किंवा कातीन** : कातीन हा कोळी वर्गातील असून, त्याला आठ पाय असतात. कपाशीच्या पिकात दोन प्रकारांतील कातीन आढळतात. एक जाळे करून राहणाऱ्या, तर दुसऱ्या जाळे न करणाऱ्या शिकारी कातीन. सर्व प्रकारच्या कातीन आपापल्या आकारमानाप्रमाणे कुठल्याही प्रकारच्या किडींना खातात. त्यामुळे कातीन सुद्धा शेतकऱ्यांचा मित्र होय.

**परोपजीवी कीटक**

**१) ट्रायकोग्रामा** : ट्रायकोग्रामाची माशी अतिसूक्ष्म असते. ती दुसऱ्या किडीच्या अंड्यात आपली अंडी घालते, त्यामुळे अंडी अवस्थेतच किडींचा नायनाट होतो. अशी ट्रायकोग्रामाची अंडी असलेली ट्रायकोकार्ड आपणाला विकत मिळू शकतात. एका कार्डावर २० हजार अंडी असतात आणि हे एक- तीन कार्ड १ एकरासाठी पुरेशे होते. या कार्डच्या विशिष्ट आकाराच्या २० पट्ट्या कपाशीच्या पानांच्या खालच्या बाजूने राहील आणि त्या सारख्या अंतरावर लावल्या जातील. कपाशीच्या शेतात बोंडअळ्यांची अंडी दिसू लागल्यावर किंवा उगवणीनंतर ४० ते ४५ दिवसांनी या पट्ट्या लावाव्यात. या पट्ट्यावरील अंड्यांमधून ७ ते ९ दिवसांत ट्रायकोग्रामाचा प्रौढ बाहेर पडून बोंडअळ्याच्या अंड्यांचा शोध घेतो व त्यात आपली अंडी घालतो. अशा तऱ्हेने अंडी अवस्थेतच किडींचा नायनाट होतो. ट्रायकोग्रामा तिन्ही प्रकारच्या बोंडअळ्यासाठी उपयोगी आहे. किडीच्या जीवनक्रमाच्या संख्येत घट करते. रासायनिक कीटकनाशकांच्या तुलनेत कमी खर्च येतो. या कीड नियंत्रक शत्रूचे उत्पादन करण्याची साधी, सोपी पद्धत आहे.

**२) एपेंटेलीस** : या मित्र किटकाची मादी बोंडअळीच्या शरीरात अंडे घालते व नंतर या अंड्यातून निघालेली एपेंटेलीसची अळी बोंडअळीवर उपजीविका करून काही दिवसात बोंडअळीच्या शरीरातून बाहेर पडते व आपले कोष तयार करते. परिणामी बोंडअळी मरते.

**३) प्रोम्यूसिडी, अर्नेसियस व अनॅगॅरस** : या तिन्ही परोपजीवी किडी कपाशीवरील पिठ्या ढेकणाच्या शरीरात अंडी घालतात व त्यांची वाढ तेथूनच पूर्ण होते. यामुळे पिठ्या ढेकूण मरतात व ते तपकिरी रंगाचे होतात. या किडीमुळे नैसर्गिकरीत्या पिठ्या ढेकणाचे मोठ्या प्रमाणात नियंत्रण झाले आहे.

वरील सर्व मित्र कीटकांचा कीड नियंत्रणात वापर करता येतो. त्यांचे संवर्धन केल्यास नैसर्गिकरीत्या शत्रू किडींचे नियंत्रण होते. त्यामुळे कपाशीवरील कीटकनाशकांचा सुरुवातीच्या काळात वापर टाळावा. त्यामुळे मित्र कीटकांचे संवर्धन होऊन कपाशीवरील किडींचे नियंत्रण होईल. अशाप्रकारे वरील मित्र कीटकांच्या साहाय्याने कपाशीवरील शत्रू किडींना यशस्वीरीत्या आटोक्यात आणता येते.



# शाश्वत शेतीसाठी मातीचे आरोग्य संवर्धन आणि व्यवस्थापनाचे महत्त्व

कृषी व्यवस्थापन

पृथ्वीच्या कवचाचा सर्वांत वरचा थर असलेली माती विविध भौतिक, सेंद्रिय आणि रासायनिक प्रक्रियांद्वारे तयार होते. मातीचे आरोग्य म्हणजे मातीची परिसंस्था आणि जमिनीच्या वापराच्या मर्यादेत एक जिवंत प्रणाली म्हणून कार्य करण्याची क्षमता, जी वनस्पती आणि प्राण्यांच्या उत्पादनास समर्थन देते, पाणी आणि हवेची गुणवत्ता राखते किंवा वाढवते आणि त्यांच्या आरोग्याला प्रोत्साहन देते.

मातीचे आरोग्य केवळ उच्च मूल्याच्या पीक उत्पादनासाठीच नव्हे, तर परिसंस्थेच्या सेवा टिकवून ठेवण्यासाठी देखील महत्त्वाचे आहे. जमिनीतील मातीचे आरोग्य चांगले असेल, तर भरघोस उत्पन्न मिळते आणि पिकांची मर्यादा राहत नाही. आपले ९९.७% पेक्षा जास्त अन्न मातीतूनच मिळते. तथापि, जगभरातील मातीच्या आरोग्याच्या ऱ्हासामुळे कृषी उत्पादकता, पाण्याची उपलब्धता तसेच जंगले आणि कुरणे यांच्या परिसंस्थांचे आरोग्य घटले आहे.

या घसरणींमुळे मानवी पोषणावरही परिणाम झाला आहे. जागतिक लोकसंख्येच्या सुमारे ६६% लोक कुपोषित आहेत. म्हणून मानव, वन्यजीव आणि परिसंस्थांच्या कल्याणासाठी मातीचे आरोग्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

जगातील जैवविविधतेच्या सुमारे २५% भाग मातीमध्ये आढळतो. चमचाभर निरोगी मातीमध्ये अंदाजे एक अब्ज सूक्ष्मजीव असतात. ही जैवविविधता पृथ्वीवरील जीवनाचा पाया आहे. मातीचे जैविक घटक जसे की, सूक्ष्मजीव समुदायांची विविधता, विपुलता, क्रियाकलाप आणि स्थिरता हे मातीच्या आरोग्य आणि गुणवत्तेचे प्रमुख सूचक आहेत. हे सूक्ष्मजीव समुदाय कृषी परिसंस्थांच्या स्थिरतेस आणि उत्पादकतेसाठी अत्यावश्यक आहेत. कणांची रचना, भुसभुशीतपणा, निचरा, उपलब्ध दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांचे प्रमाण, जमिनीची खोली आणि सूक्ष्मजीवांची संख्या या घटकांच्या मूल्यमापन आणि देखभालीवर मातीचे आरोग्य आणि सुपीकता अवलंबून असते.

**मातीचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी व्यवस्थापन पद्धती**

- **संवर्धन मशागतीची अंमलबजावणी करा** : नांगरणी आणि मशागत कमी केल्याने मातीची रचना टिकून राहते, पाणी धारणक्षमता वाढते आणि वातावरणात कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी होते.
- **संतुलित पीकपोषण** : वनस्पतींच्या चांगल्या वाढीसाठी १७ पोषक तत्त्वांची आवश्यकता असते. कोणत्याही तत्त्वाची कमतरता पिकांच्या जीवनचक्रावर परिणाम करते. म्हणून माती परीक्षण करून शिफारशीनुसार खतांचा वापर करावा.
- **अचूक खत नियोजन** : योग्य स्रोत, योग्य दर, योग्य वेळ आणि योग्य जागा यानुसार खतांचा वापर केल्यास उत्पादन, नफा, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वतता वाढते.
- **सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढवा** : पिकांचे अवशेष, शेणखत, हिरवळीचे खत आणि कंपोस्ट यांच्या वापराने मातीतील सेंद्रिय कर्ब वाढतो, कृत्रिम खतांवरील अवलंबित्व कमी होते आणि दीर्घकालीन सुपीकता सुधारते.
- **जैविक खतांचा वापर** : हे सेंद्रिय स्रोतांमधून पोषक तत्त्वांची उपलब्धता वाढवतात आणि कमीतकमी पर्यावरणीय प्रभावाने मातीचे आरोग्य सुधारतात.

● प्रणिता अशोक चिमटे
● डॉ. नंदकिशोर मेश्राम
● डॉ. नितीन खोब्रागडे
मृद्शास्त्र व कृषिरसायनशास्त्र विभाग, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली

# शेतकरी मित्रांनो दिवाळीला पुन्हा पाऊस

## आलेल्या पिकांचे नियोजन करा

हवामान अंदाज



**मान्सून खबरबात**

नैऋत्य मान्सूनची माघार रेषा २० अं उत्तर /६९ अंश पूर्व, वेरावल, भरुच, उज्जैन, झाशी, शाहजहांपूर आणि ३० अंश उत्तर/८१ पूर्व या भागातून जात आहे.

पुढील ४-५ दिवसांत मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि महाराष्ट्राच्या काही भागांमधून नैऋत्य मान्सूनच्या माघारीसाठी परिस्थिती अनुकूल आहे.

पश्चिम-मध्य आणि लगतच्या वायव्य अरबी समुद्रावरील तीव्र चक्रीवादळ शक्ती कमकुवत झाले.

पश्चिमी विक्षोभ हा उत्तर अफगाणिस्तान आणि समुद्रसपाटीपासून सरासरी ३.१ ते ५.८ किमी उंचीवर चक्राकार परिभ्रमण म्हणून पाहिला जात आहे. वरच्या उष्णकटिबंधीय पश्चिमेकडील भागात एक ट्रफ आहे, ज्याचा अक्ष सरासरी समुद्रसपाटीपासून सुमारे ७.६ किमी उंचीवर उत्तरेला लाँग. ६७ अंश पूर्व अक्षांश २७ अंश उत्तर अक्षांशावर आहे.

मागील आठवड्यात दिलेल्या अंदाजानुसार राज्यात आता पाऊस माघारी जात असल्याने काही मोजक्याच भागात पाऊस राहील.

**विदर्भ साप्ताहिक अंदाज**

- **८-९ ऑक्टोबर** : पाऊस विखूरलेल्या स्वरूपात, धुई, धूक प्रमाण वाढणार.
- **१०-१५ ऑक्टोबर** : पावसाची शक्यता फार कमी भागात. फक्त दुपारनंतर स्थानिक वातावरणात, सूर्यप्रकाश भरपूर, रात्रीला गारवा जाणवणार.

**उत्तर महाराष्ट्र**

- **८-१० ऑक्टोबर** : शक्ती चक्रीवादळ आणि बीओबीच्या कमी दाब अंश प्रभावामुळे विरळ स्वरूपात पाऊस.
- **१०-१५** : पावसाची शक्यता फक्त दुपारनंतर स्थानिक वातावरणातच, सूर्यप्रकाश भरपूर, रात्रीला गारवा.

**पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा :**

- **८-१५ ऑक्टोबर** : विरळ स्वरूपात दुपारनंतर स्थानिक वातावरणात पाऊस, दिवसा भरपूर सूर्यप्रकाश.

**सूचना** : शेतकरी मित्रांनो ज्यांचे सोयाबीन, मका, कापूस काढणीला आले ते बिनधास्त काढून घेऊ शकता; कारण दिवाळीदरम्यान १९-२२ ला पावसाच सावट आहे.

● अभिषेक सु. खेरडे
हवामान अभ्यासक, अचलपूर

# पंचसूत्री पद्धतीने रबी ज्वारीची लागवड करा

लागवड तंत्रज्ञान



**ज्वारी पिकाचे महत्व :**

संयुक्त राष्ट्र संघाने वर्ष २०२३ हे भरडधान्य वर्ष म्हणून जाहीर केले आहे. या सर्व भरडधान्यापैकी ज्वारीचा क्रमांक वरचा आहे. देशातील ऐकून ज्वारी क्षेत्रापैकी ४० टक्के क्षेत्र महाराष्ट्रात आहे. उत्पादन देखील देशाच्या तुलनेत ५७ टक्के इतके आहे.

ज्वारीचे मूळ हे आफ्रिकेत सापडते. आफ्रिकेमधून ज्वारी आशिया खंडात आणि नंतर भारतात पोहोचली. ज्वारी हे तृणधान्यवर्गीय पीक विदर्भासह महाराष्ट्रातील सुद्धा एक प्रमुख पीक असून, त्याची लागवड मुख्यत: अन्नधान्य व चाऱ्यासाठी केली जाते.

**सूत्र-०१) मूलस्थानी जलसंधारण** : रबी ज्वारीसाठी पाण्याचा पुरवठा होण्याच्या दृष्टीने ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी जमिनीच्या उतारावर ३.६० बाय ३.६० चौ.मी. आकाराचे वाफे तयार करावेत. सारा यंत्राच्या साहाय्याने सारे करून घेतल्यानंतर बळीराम नांगराने दंड टाकल्यास कमी खर्चात वाफे तयार होतात. हे वाफे रबी ज्वारीच्या पेरणीपूर्वी ४५ दिवस आधी करावे, जेणेकरून परतीच्या पावसाचे पाणी जमिनीत मुरेल. कोरडवाहू क्षेत्रात रबी ज्वारी पेरणी १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर या दरम्यात करण्याची शिफारस केली आहे. पेरणीवेळी वाफे मोडून नंतर पेरणी करावी व नंतर पुन्हा सारा यंत्राने गहू, हरभरा पिकासारखे सारे पाडून आडवे दंड टाकावे. यामुळे पेरणीनंतर पडलेल्या पावसाचे पाणीदेखील अडवून जिरवता येते. या तंत्राने रबी ज्वारीच्या उत्पन्नात वाढ दिसून येते.

**सूत्र-०२) जमीन व पूर्वमशागत** : या पिकास मध्यम ते भारी तसेच चांगला निचरा होणारी जमिनीची निवड करावी. रबी ज्वारीची पेरणी करावयाची झाल्यास, हलक्या जमिनीत पेरणी करू नये; कारण अशा जमिनीत पाणी धरून ठेवण्याची क्षमता राहात नाही, ज्यामुळे पिकाच्या संवेदनशील काळात पाणी कमी पडते. खरिपातील पीक काढल्यानंतर १०-१५ गाड्या चांगले कुंजलेले शेणखत/कंपोस्ट खत द्यावे व नंतर वखराच्या साहाय्याने उतारास आडवी मशागत केल्यास सप्टेंबर महिन्यात पडणाऱ्या पावसाचे पाणी ओलाव्याच्या स्वरूपात जमिनीत साठवले जाईल.

**सूत्र-०३) लागवडीचे नियोजन** : अपेक्षित उत्पादन मिळवण्यासाठी रबी ज्वारीची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात (१ ते १५ ऑक्टोबर) संपवावी. पेरणीमध्ये उशीर झाल्यास/केल्यास जमिनीतील ओलावा कमी होऊन परिणामी बियाणाची उगवण कमी होते आणि पेरणी लवकर केल्यास खोडमाशीचा उपद्रव वाढतो. रबी ज्वारी पेरणी करावयाच्या झाल्यास दोन ओळीतील अंतर ४५ सें.मी. (१.५ फूट) आणि हेक्टरी ७.५ ते १० किलो प्रमाणे बियाणे वापरून पेरणी करावी. पेरणीपूर्व रोगाच्या प्रतिबंधनासाठी ४०० मेश गंधक ४ ग्रॅम प्रती किलो बियाणास व खोडमाशीच्या उपद्रवामुळे होणारी पोंगे मर टाळण्यासाठी थायमीथोक्झाम ७० टक्के ३ ग्रॅम प्रती किलो किंवा इमीडाक्लोप्रीड ४८ टक्के एस.एफ ची १४ मि.ली. प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. १० किलो बियाणास प्रत्येकी २५० ग्रॅम अझोटोबॅक्टर व पीएसबी या जीवणू सवर्धकाची प्रक्रिया करावी. पेरणीसाठी दोन चाड्याच्या तिफणीचा उपयोग करावा, जेणेकरून पेरणीसोबतच खत देणे सोयीचे होईल.

**सूत्र-०४) योग्य वाणाची निवड** : अपेक्षित उत्पादन मिळवण्यासाठी रबी ज्वारीची कोरडवाहू आणि बागायती क्षेत्रासाठी रबी ज्वारीचे शिफारस केलेले सुधारित, संकरित वाण जमिनीच्या प्रकारानुसार लागवडीसाठी निवडावे. पी.के.व्ही. क्रांती, फुले रेवती, फुले वसुधा, परभणी शक्ती, परभणी सुपर मोती, फुले यशोदा, फुले सुचिता, परभणी ज्योती इ.

**सूत्र-०५) अन्नद्रव्याचे व्यवस्थापन** : रबी ज्वारीचे संकरीत व सुधारित वाण हे रसायनीक खतास (मुख्यत: नत्रास) चांगला प्रतिसाद देतात.

**रासायनिक खताचे प्रमाण (किलो/हे)**


| | जमिनीचा प्रकार | कोरडवाहू प्रकार | | |
|---|---|---|---|---|
| अ) | जमिनीचा प्रकार (खोला सें.मी.) | नत्र (युरिया) | स्फुरद (एसएमपी) | पालाश (एमओपी) |
| ०१ | मध्यम (४५-६० सेमी) | ४० (८७) | २० (१२५) | - |
| ०२ | भारी (६० पेक्षा जास्त) | ६० (१३०) | ३० (१८८) | - |
| ब) | जमिनीचा प्रकार खोली सेंमी | बागावती प्रकार | | |
| | | स्फुरद (एसएमपी) | पालाश (एमएसपी) | पालाश (एमओपी) |
| ०१ | मध्यम (४५-६० सेमी) | ८० (१७४) | ४० (२५०) | ४० (६७) |
| ०२ | भारी (६० पेक्षा जास्त) | १०० (२१७) | ५० (३१३) | ५० (८४) |

नत्र दोन हफ्त्यात (पेरणीवेळी अर्धे व पेरणीनंतर एक महिन्याने द्यावे) आणि संपूर्ण स्फुरद व पालाश हे पेरणीच्या वेळेस द्यावे. कोरडवाहू जमिनीस संपूर्ण नाव व पालाश (हेक्टरी ५०:२५:२५ किलो) दोन चाड्याच्या पाभरीने पेरून घ्यावे.

● प्रा. कुणाल एन. गावंडे
सहा. प्राध्यापक कृषी विद्या श्री सं शं. म. कृषी महाविद्यालय, पिंपळखुटा
● निखिल रमेश यादव
एम.एस.ॲग्री

# संत्र्यावरील डिंक्या रोगाचे नियंत्रण

फळबागांचे आर्थिक आयुष्य कमी होण्यामागे रोगांचा प्रादुर्भाव हे लिंबूवर्गीय पिकांमधील एक महत्त्वाचे कारण आहे. अनेक बुरशीजन्य रोगांमुळे झाडांचा जोम, वाढ व उत्पादनक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. डिंक्या हा लिंबूवर्गीय फळझाडांना होणारा फायटोफ्थोराया बुरशीजन्य रोगामुळे निर्माण होणारा अतिशय गंभीर व आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा रोग आहे. याचा प्रादुर्भाव रोपवाटिकेपासून ते प्रौढ बागांपर्यंत आढळून येतो. विशेषतः विदर्भातील संत्रा बागांमध्ये या रोगामुळे मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. फायटोफ्थोराबुरशी जमिनीत एकदा आल्यावर तिचे निर्मूलन करणे अत्यंत कठीण असते, त्यामुळे शेतकऱ्यांनी या रोगाविरुद्ध सुरुवातीपासूनच योग्य काळजी घेऊन संत्राबागेचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करणे अत्यावश्यक आहे.



**ज्या ठिकाणाहून डिंक ओघळतो, त्या झाडाची साल धारदार व निर्जतुक केलेल्या पटाशीने किंवा चाकूने काढून रोगट भाग १ टक्के पोटॅशियम परमॅग्नेटच्या द्रावणाने (१०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी) निर्जतुक करावा व त्यावर बोर्डोमलम (१:१:१०) लावावा.**

**रोगाचा प्रादुर्भाव**

रोगग्रस्त रोपवाटिकेतील रोपे लागवडीसाठी वापरल्यास, रोगाचा प्रादुर्भाव सुरुवातीपासूनच होतो. पाण्याचा योग्य निचरा न होणाऱ्या जमिनीत फळबागेची लागवड केल्यास या रोगाचा प्रसार व प्रादुर्भाव होण्याची शक्यता अधिक असते. तसेच, बागेत पाटपाणी किंवा सपाट वाफे पद्धतीने पाणी दिल्यास, वाफ्यात बराच वेळ पाणी साचते आणि ते झाडाच्या बुंध्याशी संपर्कात येते, ज्यामुळे रोगाचा प्रादुर्भाव हमखास होतो.

डिंक्या रोगाचे बुरशीजन्य बीजाणू संत्रा बागेतच टिकून राहतात. पावसाच्या जोरदार सरींमुळे मातीसोबत हे बीजाणू झाडाच्या बुंध्याजवळ पोहोचतात. पावसाळ्यात जमीन सतत ओली राहणे, दमट वातावरण, अपुरा सूर्यप्रकाश व तापमान २६-३२ अंश असणे या बुरशीच्या वाढीस अनुकूल ठरते. अशा परिस्थितीत बुरशी झाडाच्या पेशींमध्ये प्रवेश करून खोडावर व मुळांवर संक्रमण करते, ज्यामुळे रोगाचा झपाट्याने प्रसार होऊन संपूर्ण बाग धोक्यात येते.

**रोगाची लक्षणे**

डिंक्या रोगाची लक्षणे रोपवाटीकेपासूनच दिसायला लागतात. रोगग्रस्त रोपे पिवळी पडून त्यांची वाढ खुंटते. बागेत झाडाच्या कलमयुतीचा भाग, बुंध्याच्या चिरांमधून किंवा खोडावरील जखमांमधून पाण्यासारखा पातळ व पिवळसर ते तपकिरी, काळ्या रंगाचा चिकट डिंकासारखा स्रावबाहेर पडतो. सालीचा आतील भाग करड्या रंगाचा होतो. सालीचा रंग क्रमाक्रमाने बदलून काळपट, भुरकट होउन तिला उभ्या भेगा पडतात. फायटोप्थोरा बुरशीमुळे मुळे कुजतात, परिणामी झाडाला पोषणद्रव्यांचा पुरवठा खंडित होतो. त्यामुळे पानांच्या शिरा पिवळसर होतात आणि पाने पूर्णपणे पिवळी पडतात. रोग गंभीर झाल्यास फांद्यांवरील पाने, फळे गळतात. कालांतराने झाड सुकून जाते, फांद्या शेंड्याकडून खाली वाळतात आणि अखेरीस रोगाच्या तीव्रतेनुसार संपूर्ण झाड दगावते.

**प्रतिबंधक उपाययोजना व प्रभावी नियंत्रण**

लिंबूवर्गीय फळबागांमध्ये डिंक्या रोगांचा प्रादुर्भाव एकदा झाला की त्यांचे निर्मूलन करणे कठीण होते. त्यामुळे सुरुवातीपासूनच एकात्मिक व्यवस्थापन तत्त्वांचा अवलंब करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. खालील उपाय शेतकऱ्यांनी वेळेवर आणि एकत्रित रितीने केल्यास रोगावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते आणि बागेचे आयुष्य व उत्पादन क्षमतेत लक्षणीय वाढ होते.

आळ्यातून पाणी देण्याची पारंपरिक पद्धत टाळावी, कारण त्यामुळे रोगाचा प्रसार वाढतो. त्याऐवजी ठिबक सिंचन किंवा दुहेरी आळे (बांगडी) सिंचन पद्धतीचा वापर करावा, ज्यामुळे पाणी थेट बुंध्याशी संपर्कात येत नाही.

झाडांना आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी देऊ नये तसेच पावसाळ्यात बागेत पाणी साचू नये म्हणून झाडांच्या ओळींमधून चर तयार करून योग्य निचरा ठेवावा.

खोडावर पायकूज झाल्यास, तो भाग खरवडून स्वच्छ करावा व त्यावर बोर्डो पेस्ट (१:१:१०) किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड लावावा.

झाडाभोवती जमिनीत सायमोक्झेनिल ८% + मॅन्कोझेब ६४% डब्लू.पी. (०.२%) अधिक जवस तेल (०.२%) किंवा मेटालेक्सिल एम ३.३% + क्लोरोथॅलोनील ३३.१% एस.सी. (०.२%) यापैकी एक पाण्याचे द्रावण ५ लिटर प्रती झाड या प्रमाणात खोडाभोवती झाडाच्या परिघात ओतून जमिनीतून द्यावा.

रोग दिसताक्षणी ट्रायकोडर्मा हार्जियानम अधिक ट्रायकोडर्मा व्हीरिडी अधिक सुडोमनास फ्ल्यूरोसन्स १०० ग्रॅम प्रत्येकी प्रती झाड १ किलो शेणखतात मिसळून झाडाचे परिघात जमिनीतून द्यावा.

नवीन लागवडीसाठी रंगपूर लिंबूसारखा सहनशील खुंट वापरावा व डोळा साधारण ३० से.मी. उंचीवर बांधावा.

रोगग्रस्त झाडांवर व आसपासच्या झाडांवर फॉसिटील-एएल (०.२५%) किंवा पोटॅशियम फॉस्फोनेट (३० ग्रॅम/१० लि. पाणी) या द्रावणाच्या २ फवारण्या (जून - ऑगस्ट) कराव्यात.

पावसाळ्यापूर्वी (मे) व पावसाळ्यानंतर (ऑक्टोबर) झाडाच्या बुंध्यापासून जमिनीतून १ मीटर उंचीपर्यंत बोर्डो पेस्ट (१ कि. मोरचूद + १ कि. चुना + १० लि. पाणी) लावावी, ज्यामुळे डिंक्या रोगाचा दीर्घकालीन परिणाम रोखता येतो.

झाडाच्या फांद्या, मुळे व खोड यांना आंतर मशागती दरम्यान इजा होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

या सर्व उपायांचा एकत्रित अवलंब केल्यास डिंक्या रोगावर प्रभावी नियंत्रण मिळते व लिंबूवर्गीय फळबाग निरोगी राहते.

**(टीप : संबंधित बुरशी नाशके लेबल क्लेम शिफारशीत किंवा अग्रेस्को मान्यताप्राप्त आहेत.)**

● विजय पं. शिंदे
● डॉ. योगेश वि. इंगळे
वनस्पती रोगशास्त्र विभाग, डॉ. पंदेकृवि, अकोला

● संयोजक : निखिल रमेश यादव, कृषी पदव्युत्तर- ८४०८९१२७०६ ●

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सायलेन्स ऑफ हार्मोनी मान्सून शो, या कला प्रदर्शनाचे उद्घाटन

## प्रदर्शनातून जमा झालेल्या रकमेतील ५० टक्के हिस्सा पूरग्रस्तांच्या मदतीसाठी



तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर – सायलेन्स ऑफ हार्मोनी मान्सून शो, या कला प्रदर्शनाचे उद्घाटन शनिवार दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर मधील यशवंत कला महाविद्यालयाच्या कला दालनात करण्यात आले.या प्रसंगी उद्घाटक म्हणून देवगिरी महाविद्यालयाचे कार्यकारिणी सदस्य विवेक भोसले हे उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान छत्रपती संभाजीनगर फर्स्ट चे अध्यक्ष मुकुंद कुलकर्णी यांनी भुषविले. विशेष अतिथी म्हणून रोटरी क्लब औरंगाबाद पश्चिम चे अध्यक्ष मैत्रेय मुदकवी, सचिव हेमंत लांडगे, निवृत्त प्राध्यापक सुभाष फासे, प्रा. सुरेंद्र जगताप, मुंबई व यशवंत कला महाविद्यालयाचे प्राचार्य रविंद्र तोरवणे, चुडावा जिल्हा परिषद शाळेचे निवृत्त कलाशिक्षक रमाकांत देशमुख उपस्थित होते. या प्रदर्शनामध्ये चित्र,कलाकृती यांच्या विक्रीतून जमा झालेल्या निधीतील ५०% पूरग्रस्तांच्या मदतीसाठी देण्यात येणार आहे.

साक्री तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत कला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर मध्ये दिनांक ११ ते १८ ऑक्टोबर २०२५ या दरम्यान या मान्सून शो चे आयोजन करण्यात आलेले आहे. साक्री तालुका एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष पराग उत्तमराव बेडसे व सचिव अनिल सोनवणे यांनी याप्रसंगी शुभेच्छा दिल्या. रोटरी क्लब औरंगाबाद पश्चिम च्या संयुक्त विद्यमाने या कला प्रदर्शनात जी विक्री होईल त्याचा अर्धा भाग महाराष्ट्रातील पुरग्रस्त नागरिकांच्या साहाय्यासाठी देण्यात येईल. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या कलावंतांनी आपल्या ७७ कलाकृती या प्रदर्शनात प्रदर्शित केलेल्या आहे. कला रसिकांपर्यंत आपल्या कलाकृती पोहोचविण्याचे प्रदर्शन हे एक प्रभावी माध्यम असल्यामुळे कला रसिक, कलाप्रेमी दरवर्षी या मान्सून शो ची प्रकर्षाने वाट पाहत असतात.

यशवंत कला महाविद्यालय अनेक प्रदर्शने राज्य व आंतरराज्य पातळीवर आयोजित करत असते . महाविद्यालयाला ६५ वर्ष पूर्ण झाली या उद्देशाने महाराष्ट्रातील ६५ नामवंत प्राध्यापक वृंद व कलावंत यात सहभागी झाले आहेत. यातील काही प्रमुख कलाकारांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

प्रा. केशव मोरे, नाशिक, सुरेंद्र जगताप, मुंबई, बाळासाहेब पाटील, सांगली, वैशाली पाटील, कोल्हापूर, सत्यजित वरेकर, सांगली,प्रवीण देशमुख चुडावेकर ,आप्पासाहेब काटे, छ. संभाजीनगर, रवींद्र तोरवणे, पिसुओ, अजित देवळाणकर, श्वेता वैद्य, प्रवीण मुखेकर, अविनाश सातपुते, जे नंदकुमार, गजानन बोबडे, चंद्रशेखर उमेकर, मृण्मयी बोबडे, त्रिशला काळे.

शहरातील सर्व कला रसिकांनी प्रदर्शनाला भेट द्यावी तसेच यथाशक्ती खरेदी करून पुरग्रस्तांना मदत करावी असे आवाहन आयोजकांनी केली आहे.

### प्रवीण देशमुख यांच्या २ फोटोची निवड




महाराष्ट्रातील ख्यातनाम कलावंतांच्या कलावंतांच्या७७ कलाकृती या प्रदर्शनात ठेवण्यात आल्या, यामध्ये चुडावा ता. पूर्णा जि. परभणी येथील कलावंत प्रवीण देशमुख यांच्या दोन फोटोंची या प्रदर्शनासाठी निवड करण्यात आले, या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरात अभिनंदन करण्यात आले.

# झोपेत मृत्यू की काहीतरी वेगळं?

## बहिरगाव रोडवरील घटनेने उडाली खळबळ



तभा वृत्तसेवा –

कन्नड, दि. १२ ऑक्टोबर– तालुक्यातील बहिरगाव रोडवरील टोमॅटो गोदामावर काम करणाऱ्या उत्तर प्रदेशातील एका मजुराचा झोपेतच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मृत मजुराचे नाव राजकुमार अमरसिंग (वय २२, रा. वाजीदपूर, ता. सिंकदरराव, जि. हातरस, उत्तर प्रदेश) असे आहे. तो मागील अडीच महिन्यांपासून बहिरगाव रोडवरील टोमॅटो गोदामावर मजुरीचे काम करत होता.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ११ ऑक्टोबर रोजी कामगारांमध्ये किरकोळ वाद झाला होता. या वादात अमरसिंग याच्या कानाला किरकोळ दुखापत झाली होती. त्याच्यावर खाजगी दवाखान्यात उपचार करून तो परत गोदामावर गेला. रात्री जेवण करून तो झोपी गेला; मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी तो उठलाच नाही.

सोबत असलेल्या मजुरांनी ही बाब त्वरित गोदाम मालक रामदास शिरसे यांना कळवली. त्यानंतर अमरसिंग याला तत्काळ कन्नड ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली पठारे यांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. अमरसिंगच्या गूढ मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्याच्या पश्चात आई, दोन बहिणी आणि एक भाऊ असा परिवार आहे. शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रघुनाथ सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक टीलोकचंद पवार करत आहेत.

# कै. इंद्रचंदजी मानकचंदजी मुथा व कै. सौ. चारुलताबाई इंदरचंदजी मुथा यांच्या स्मरणार्थ शवपेटीचे लोकार्पण



लासूर स्टेशन (प्रतिनिधी) : श्री गणेश मंदिर संस्थान, लासूर स्टेशन येथे कै. इंद्रचंदजी मानकचंदजी मुथा व कै. सौ. चारुलताबाई इंदरचंदजी मुथा यांच्या स्मरणार्थ शवपेटीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी गणरायाची महाआरती करून विधीवत पूजा पार पडली. या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी अभयकुमार,रोहितकुमार, हर्षकुमार मुथा व सहपत्नी यांनी केले.कार्यक्रमात त्यांचा सत्कारही करण्यात आला. गावकऱ्यांनी या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाला मर्चंट बँकेचे माजी संचालक मदनलालजी लोढा, दिगंबर जैन समाजाचे माजी अध्यक्ष विनोदकुमार ठोळे, प्रकाश शेठ कर्णावट, संतोष पाटील जाधव, संतोष शेठ शर्मा, दिगंबर पवार, गोकुळ शेठ राजपूत, नाना मतसागर,आरती मंडळाचे अध्यक्ष अजय जैस्वाल, संतोष साखळे आदी मान्यवर उपस्थित होते.शवपेटी उपक्रमासाठी बाळू शर्मा,नारायण ठोळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सुदैवी जोशी पैठण नगराध्यक्षा पदाच्या प्रबळ दावेदार



पैठण दि १२ :– पैठणला राजकीय,शैक्षणिक,सामाजिक आणि धार्मिक वारसा असलेले माजी नगराध्यक्ष स्वर्गीय सोमनाथराव जोशी यांच्या सुनबाई सुदैवी योगेश जोशी महाविकास आघाडीतील काँग्रेस आय या घटक पक्षा कडून नगराध्यक्षा पदाच्या प्रबळ दावेदार असून जोशी परिवाराचा वारसा आपण पुढे नेणार असल्याचे भावी नगराध्यक्षा सुदैवी योगेश जोशी यांनी स्पष्ट केले आहे. पैठण शहराचा विकास, जडणघडण आणि शिस्तबंध पद्धतीने केलेल्या कामांसाठी आजही माजी नगराध्यक्ष स्वर्गीय सोमनाथराव जोशी यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यातच मागील नगर परिषद कॉन्सील मध्ये त्यांच्या परिवारात उप नगराध्यक्षा पद होते. योगेशराव जोशी यांच्या पत्नी सुदैवी जोशी या नगर परिषद निवडणूक २०२५ नगराध्यक्षा पदाच्या प्रबळ दावेदार आहेत. त्यांनी डीएड तसेच इलेट्रिक इंजिनियरचा डिप्लोमा केला आहे. त्यांचे माहेरचे नाव सारिका सोनटक्के असे आहे. तर त्यांचे माहेर वडोत सिल्लोडचे आहे.जिजामाता प्राथमिक शाळाच्या जिजामाता महिला मंडळाच्या त्या अध्यक्ष आहेत. स्वर्गीय सोमनाथराव जोशी यांच्या मातोश्री प्रमिलाताई माधवराव जोशी यांनी सूरू केलेलं शिक्षणाचा वारसा त्या पुढे नेत आहेत. पक्षाने संधी दिल्यास आपण नगराध्यक्ष निवडणूक लढवू असा निर्धार सुदैवी योगेश जोशी यांनी केला आहे.

# स्वयम् शिक्षण प्रयोग संस्थेअंतर्गत ५००० महिला शेतकऱ्यांसोबत पर्यावरण पूरक शेतीचे उल्लेखनीय काम




सिल्लोड प्रतिनिधी – एसएसपी च्या माध्यमातून प्रकल्पांतर्गत प्रत्येक गावात पाच शेतकरी डेमो फार्मर यांना गांडूळ खत, दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क बनवण्यासाठी वर्मी बेड वाटप केले आहेत. चिंचपूर या गावातील डेमो फार्मर रुक्मिण विश्राम बडक व रेखा भानदास हिवरे या दोन शेतकऱ्यांनी स्वयम् शिक्षण प्रयोग संस्थेकडून जैविक शेती कशी करायची याविषयी ट्रेनिंग घेतले. त्यांना रसायनिक खते, औषधे यावर जास्त अवलंबून राहणे आणि नगदी पिकाकडे होणारा वाढता कल, यामुळे लहान आणि सीमांत शेतकरी हे असुरक्षित बनले आहेत हे समजले. शाश्वत कृषी पद्धतींना चालना देऊन, रासायनिक फवारणी, खते, बियाणे यावरील खर्च कमी करून जैविक शेती करणे व शेतीला जोड व्यवसाय करून आर्थिक बाजू सुधारेल यासाठी विविध प्रशिक्षण दिले गेले. संस्थेच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शेतीला जोड व्यवसाय म्हणुन गांडूळ खत हा व्यवसाय सुरुवात केली. यामध्ये एसएसपी ने दिलेले वर्मी बेड व स्वतःचे असे २५ वर्मी बेड लावून एक नवीन सुरुवात केली व शेतकऱ्यांसमोर आदर्श उभा केला आहे. स्वयं शिक्षण प्रयोग प्रकल्प व्यवस्थापक सम्राट कसबे सर, तालुका समन्वयक अर्चना कोळी, वैशाली घुगे, शुभम कुमावत, पुष्पा तुपे आणि गाव सखी निकिता गोपाळ जंजाळ या सर्व मान्यवरांच्या मार्गदर्शनातून चिंचपुर गावात शेतीमधील अमुलाग्र बदल घडत आहेत.

# गुरुदेव समंतभद्र विद्या मंदिर मध्ये सामान्य ज्ञान स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न



खुलताबाद प्रतिनिधी : वेरूळ येथील गुरुदेव समंतभद्र विद्या मंदिर मध्ये प्रशालेचे क्रीडा शिक्षक आशिष देवकुमार कान्हेड यांच्या मातोश्री जया देवकुमार कान्हेड यांच्या स्मरणार्थ गत पंधरा वर्षापासून सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षेचे ज्ञान व्हावे या अपेक्षेने संपूर्ण शालेय स्तरावर स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यासाठी प्रशालेतून सर्व शिक्षकांचा प्रायोजक म्हणून सहभाग असतो आज या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ अत्यंत उत्साहात संपन्न करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष स्थानी प्रशालेचे माजी मुख्याध्यापक निर्मल कुमार थोले हे अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख अतिथी पदी चैतन्य कुमार वायकोस, चंदना वायकोस, सचिन चतुर,रमेश चतुर सुनंदा चतुर, सुभाष चतुर, आशिष कान्हेड, तसेच संगीता गवळी प्रशालेचे मुख्याध्यापक गुलाबचंद बोराळकर पर्यवेक्षक सुकमार नवले यांची उपस्थिती होती. यावेळी प्राथमिक गटातून तेजल योगेश गुशिंगे, स्वरा युवराज काळे, शिवम सदाशिव साबळे, तर माध्यमिक गटातून प्रांजल परमेश्वर पगारे, पवन धारासिंग राठोड, रोहन रमेश धरणे या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक प्राप्त केला.

# वसंतदादा काळे यांचे निधन



सोयगाव,दि.१२ ऑक्टोबर – शहरातील वसंतदादा विष्णू काळे ( वय.६५) यांचे दि.११ शनिवार रोजी सायंकाळी सात वाजता निधन झाले.त्यांच्यावर रविवारी सकाळी ११:०० वा. घराजवळील मळ्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई,पत्नी,दोन मुले,सुना,नातवंडे असा परिवार आहे.सहकार महर्षी कै. विष्णूदादा काळे यांचे ते चिरंजीव तर सोयगावचे प्रथम माजी नगराध्यक्ष कैलास दादा काळे यांचे ते भाऊ होत.

# रेणुका देवी शरद साखर कारखाण्याचा १० वा बॉयलर अग्नीप्रदीपन समारंभ संपन्न



तभा वृत्तसेवा

पैठण दि १२ :– चोंढाळा ता. पैठण येथे रेणुकादेवी शरद सहकारी साखर कारखाना लिमिटेड चोंढाळा विहामांडवा येथे २०२५–२६ गळीत हंगामाचे बॉयलर अग्नीप्रदीपण समारंभ कारखान्याचे संचालक राजु नाना भुमरे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ छायाताई राजु नाना भुमरे यांच्या शुभहस्ते आणि खासदार संदिपान पाटील भुमरे, कारखाण्याचे चेअरमन आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या प्रमुख उपस्थितीत धार्मिक अनुष्ठाणाने संपन्न झाला.

यावर्षी आपण कारखान्याचे गाळप क्षमतेमध्ये वाढ केलेली असून आपला कारखाना यावर्षी २१०० ते २२०० मे. टन प्रतिदिन या प्रमाणे गाळप करण्यासाठी आपण कारखान्यामध्ये हर्वेस्टर वाहने खाली करण्यासाठी नवीन टिपलर क्षमता वाढीसाठी एस के बॉडी, पॅन, क्रिस्टलायझर, हीटर, सल्फर भट्टी, ऑलिव्हर इत्यादी प्रकारची नवीन मशिनरी बसवलेली आहे. २१०० ते २२०० प्रतिदिन गाळप करण्यासाठी अनेक प्रकाराचे छोटे मोठे बदल केलेले आहेत. त्यासाठी आपण सुमारे ६ ते ७ कोटी रु. खर्च केलेला असल्याची माहिती कारखाण्याचे चेअरमन आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी या प्रसंगी दिली.

तसेच यावर्षी आपला कारखाना सुमारे ३ ते ३.५० लाख मे. टन गाळप करण्याचे उद्दिष्ट असून त्यासाठी लागणारी पुरेशी व सक्षम अशी ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा आपण भरणा केलेली आहे. त्यासाठी आपण ऊस तोडणी वाहतूक यंत्रणेला ६ ते ७ कोटी रु. अँडव्हान्सचे वाटप केले असल्याचे चेअरमन आमदार विलास बाप्पू भुमरे म्हणाले.

याप्रसंगी व्हाईस चेअरमन नंदू काका पठाडे, नंदू अण्णा काळे, नितीन तांबे, चंद्रकांत गवांदे, लक्ष्मण डांगे, विष्णू नवथर, ब्रह्मदेव नरके, भीमराव वाकडे, अक्षय डुकरे, दिलीप बोडखे, सुभाष गोजरे अमोल थोरे, भरत तवार, कल्याण धायकर, डॉ. संदीपान काकडे, नाना गाभूड, पुष्पाबाई लांडगे, ज्ञानदेव बढे, कार्यकारी संचालक नामदेव बावडकर, रेणुकादेवी शुगर मिल्सचे दत्तात्रय रेवडकर, रोहिदास रेवडकर, श्रीमंत टेकाळे,संपत गांधले, सतीश आंधळे, मुकेश काला,लहु डुकरे, दत्तात्रय वाकडे, सुनील डुकरे, पांडुरंग पवार, दिपक गाभुड, पंडीत धायकर, शरद नवथर,चंद्रकांत पाटील, आबादेव थोटे, रमेश झिरपे, सचिन असबे, डी. एन औताडे,धालपे वर्क्स मॅनेजर, चौधरी चीफ इंजिनिअर,सोमनाथ मुळे, महेश मस्के, पोलीस निरीक्षक सचिन पंडित, सह विहामांडवा पोलीस चौकीचे पीएसआय हरिविजय बोबडे साहेब व अंमलदार बरबडे यांच्यासह सभासद, कर्मचारी, शेतकरी तसेच मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी यांची उपस्थिती होते.

# बुलडाणा अर्बन' बँकेच्या उंडणगाव शाखेकडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांची वाटप



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१२ ऑक्टोबर

माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या बुलडाणा अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेने पुन्हा एकदा लोकहिताचा आदर्श निर्माण केला आहे.बँकेचे अध्यक्ष डॉ. सुकेशजी झंवर यांच्या ५० व्या सुवर्णमहोत्सवी वाढदिवसानिमित्त उंडणगाव शाखेच्या वतीने येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या समाजोपयोगी उपक्रमातून एकूण ४०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी 'बुलडाणा अर्बन' बँकेचे सिल्लोड विभागीय व्यवस्थापक संजय दळवी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्यात आले.यावेळी स्थानिक संचालक नरेंद्र खंडेलवाल,दादाराव कौशल्ये,भगवान तबडे,रत्नाकर अप्पा खुल्लोडकर,शाखा व्यवस्थापक गजानन झाल्टे,प्रशांत कुलकर्णी,विभागीय लेखा परीक्षक अनिल बोर्डे,कर्मचारी समाधान दौड,योगेश निकम,सागर सावळे,समाधान पांढरे, शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक भोटकर, विजय काकडे, रफियोद्दीन शेख शिक्षकवर्ग,पालक, विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.सुकेशजी झंवर यांच्या प्रेरणेतून बुलडाणा अर्बन बँक केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित न राहता सामाजिक उत्तरदायित्व जपते, असे मत विभागीय व्यवस्थापक संजय दळवी यांनी यावेळी व्यक्त केले.

# भारतीय कंपनी सचिवचे ५३ वे राष्ट्रीय अधिवेशन २ नोव्हेंबर रोजी



छत्रपती संभाजीनगर, (तभा वृत्तसेवा): भारतीय कंपनी सचिव संस्था प्रगतीशील, समावेशक आणि शाश्वत भारताच्या निर्मितीसाठी विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेचे ५३ वे राष्ट्रीय अधिवेशन २ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रगतीशील, समावेशक आणि शाश्वत भारत या थीमवर होणार आहे. आर्थिक विकास, कॉर्पोरेट शाश्वतता, नवोपक्रम आणि तंत्रज्ञान या विषयांवर चर्चा असल्याचे संस्थेचे अध्यक्ष धनंजय शुक्ला यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित आढावा बैठकीसाठी ते आले होते.यावेळी सी.एस. पवनजी चांडक उपाध्यक्ष, सी.एस. आशिष करोडिया, केंद्रीय परिषद सदस्य, सी.एस.ऋषिकेश वाघ चेअरमन, सी.एस. महेशदुबे (चेअरमन, छत्रपती संभाजीनगर चॅप्टर),सी.एस. साईश्वर व्यास (सेक्रेटरी छत्रपती संभाजीनगर चॅप्टर) उपस्थित होते.

पुढे बोलताना धनंजय शुक्ला यांनी सांगितले की, यापूर्वी खउडख ने ३ ते ५ सप्टेंबर २०२५ रोजी ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे चौथी आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली होती.

संस्थेने महिला व्यावसायिकांसाठी रीबूट कोर्स, सागरी नियमनातील एमबीए, यूएई बिझनेस मॅनेजर कोर्स, तसेच कॉर्पोरेट मार्केट अनुपालनावर प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

सशस्त्र दल, शहीदांचे कुटुंब, ईशान्य राज्ये आणि दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शुल्क माफी व सवलती देण्यात आल्या आहेत. खउडख सातत्याने शिक्षण, संशोधन आणि सुशासन क्षेत्रात नवे मानदंड प्रस्थापित करत आहे.

# मंदिर स्वच्छता सेवा अभियानाला समाजाचा प्रतिसाद




छत्रपती संभाजीनगर – देवगिरी प्रांतातील १४ जिल्ह्यात २२०० मंदिराच्या स्वच्छतेसाठी विविध संस्था संघटनासह १५०० च्या वर कार्यकर्त्यांचा सेवा सहभाग. विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित आयामाने केलेल्या मंदिर स्वच्छता अभियानाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन संपूर्ण मराठवाडा आणि खानदेश मिळून १४ जिल्ह्यातील २२०० मंदिराच्या स्वच्छतेसाठी विश्व हिंदू परिषदेसह पतंजली योग समिती जनसेवा फाउंडेशन,जय जय रघुवीर समर्थ सेवाभावी संस्था,गरुड झेप अकॅडमी सह विविध संस्था संघटना, उपासना, विद्यार्थी,धार्मिक सामाजिक संस्था मंदिरांचे विश्वस्त यांच्या १५०० च्या वर कार्यकर्ते भाविक महिला पुरुषांनी मंदिरे, बौद्ध विहार, जैन स्थानक ,गुरुद्वारे तसेच हिंदू धर्मातील सर्व धार्मिक स्थानांच्या स्वच्छतेसाठी उस्फूर्त सहभाग नोंदवला. अभियानाचे हे तिसरे वर्ष आहे.

**रविवार दिनांक १२ ऑक्टोबरला बऱ्याच जणांना सेवा स्वच्छता अभियानात सहभाग नोंदवता आला नाही त्यांनी दिवाळीपूर्वी १९ ऑक्टोबर पर्यंत हे अभियान राबवावे असे आवाहन मंदिर अर्चक पुरोहित आयाम प्रमुख राजीव जहागीरदार यांनी केले. ते म्हणाले मंदिर ही आमची श्रद्धा केंद्र आहेत ती स्वच्छ असलीच पाहिजे आणि यामध्ये भाविकांनी स्वतः श्रमदान करून ते तसे ठेवले पाहिजे, या अर्थाने मंदिर चालवण्यामध्ये, व्यवस्थापनामध्ये भाविकांचा सहभाग वाढवणे हा या अभियानाच्या मागचा हेतू आहे.**

रविवार दिनांक १२ ऑक्टोबरला सकाळी सात ते अकरा या चार तासात हे अभियान सर्वदूर राबवले गेले.मंदिर आयामाच्या वतीने मागच्या वर्षी १८५० मंदिरांमध्ये स्वच्छता सेवा दिली होती.

महिनाभर आधीपासून तयारी

मंदिर स्वच्छता अभियानासाठी मागील एक महिन्यापासून तयारी सुरु होती.यासाठी विविध संस्था संघटनांबरोबर बैठका संपन्न झाल्या .मंदिरांसह सर्व धार्मिक स्थानांच्या याद्या तयार करण्यात आल्या. मंदिर स्वच्छतेसाठी आवश्यक ते साहित्य झाडू खराटे पोछा इलेक्ट्रिक ब्लोअर इत्यादीची उपलब्धता स्थानिक स्तरावर करण्यात आली.

# एमजीएममध्ये 'फिजिकॉन २०२५' आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वीपणे संपन्न




छत्रपती संभाजीनगर, दि.१२ : एमजीएम स्कूल ऑफ फिजिओथेरपी आणि एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय 'एमजीएम फिजिकॉन २०२५' या आंतरराष्ट्रीय फिजिओथेरपी परिषदेचा समारोप समारंभ आज मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत रुक्मिणी सभागृह येथे संपन्न झाला. यावेळी विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी, एमजीएमच्या प्रकल्प संचालिका डॉ.प्रेरणा दळवी, डॉ. संदेश लोंढे, प्राचार्य डॉ.सरथ बाबू, प्राचार्य डॉ.रिंकल मलानी, जनसंपर्क अधिकारी श्रीकांत येरूळे, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

'एमजीएम फिजिकॉन २०२५' ही आंतरराष्ट्रीय परिषद शनिवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ आणि रविवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ असे दोन दिवस आयोजित करण्यात आली होती. 'इम्पावरिंग मुव्हमेंट' या अर्थपूर्ण संकल्पनेवर आधारित या परिषदेचा उद्देश फिजिओथेरपी या मानवी शरीराच्या हालचाली पुनर्स्थापित आणि बळकट करणाऱ्या विज्ञानाच्या नव्या दिशांना अधोरेखित करणे हा होता. या परिषदेत देश–विदेशातील १६ तज्ञांनी फिजिओथेरपी क्षेत्रातील नव्या संकल्पना, संशोधन आणि उपचार पद्धतींवर मार्गदर्शन केले.

पोस्टर, पेपर –प्रोफेशनल, पेपर – इनोव्हेशन ( स्टुडंट्स ) आणि सांस्कृतिक अशा विविध स्पर्धांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या प्रथम आणि द्वितीय विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते यावेळी सन्मानित करण्यात आले. एमजीएम स्कूल ऑफ फिजिओथेरपी (छत्रपती संभाजीनगर), एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी (छत्रपती संभाजीनगर), धनेश्वरी कॉलेज ऑफ फिजिओथेरपी (छत्रपती संभाजीनगर), डी. ई.एस. ब्रिजलाल जिंदाल कॉलेज ऑफ फिजिओथेरपी (पुणे) , श्रीमती राधिकाताई पांडव कॉलेज ऑफ फिजिओथेरपी (नागपूर), बबनदादा पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी (तळोजा, नवी मुंबई), शिवा ट्रस्ट, कॉलेज ऑफ फिजिओथेरपी (छत्रपती संभाजीनगर), ओजस कॉलेज ऑफ फिजिओथेरपी (जालना), सेंट अँड्रयूज कॉलेज ऑफ फिजिओथेरपी (हडपसर,पुणे) आदि महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये पारितोषिक मिळवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रेणुका खेडेकर यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## रोखठोक

दिनेश गुणे

# गोष्ट छोटी, डोंगराएवढी!

सामाजिक समतेच्या संवेदना ज्या समाजात जिवंत असतात तो समाज सुसंस्कृत आणि समंजस समजला जातो. त्या दृष्टीने महाराष्ट्र हे सुदैवी राज्य आहे. समतेच्या जाणिवा या राज्यात शतकांपासून जिवंत आहेत आणि या राज्याने संपूर्ण देशात या जाणिवा रुजविण्याचे कामदेखील व्रतस्थपणे केले आहे. सामाजिक सुधारणांचा पाया या राज्यात सर्वांत अगोदर घातला गेला आणि त्या विचारांचा मागोवा घेत देशात समाजसुधारणेचे वारे वाहू लागले. या परंपरेची वाटचाल कालपरवाची नाही. ती एक प्रदीर्घ वाटचाल आहे आणि त्यामध्ये अनेक सुधारक, विचारवंत, राजकीय नेते, समाजाच्या विविध वर्गांतील सामान्य माणसेही मनापासून सहभागी झाली आहेत. म्हणूनच, समतेच्या संवेदना जिवंत राहण्यासाठी जेव्हा साद घालू लागतात तेव्हा या विचारापासून भरकटण्याच्या भीतीने समाज सजग होतो आणि सामाजिक समतेच्या रस्त्यावरील वाटचाल पुन्हा सुरळीत सुरू होते. या वाटेवर अडथळे अजिबात नाहीत असे नाही. त्यावर हेतुत: काटे पसरविण्याचे उद्योग होत नाहीत असेही नाही. पण ते अगदी अनैसर्गिकही म्हणता येणार नाही. समाज हा विविध मानसिकतांचा, वेगवेगळ्या स्वभावांचा समूह असल्याने त्यामध्ये ज्याप्रमाणे निरपेक्ष कर्तव्यबुद्धी आढळते, तसेच क्षुद्र स्वार्थाचेही अस्तित्व दिसून येते. तसे नसते तर सामाजिक सुधारणा ही एका दीर्घ संघर्षाची वाटचाल राहिलीच नसती. तो एक सहज, सरळसोट रस्ता झाला असता आणि सारे समाजसमूह एकमेकांचे हात धरून सार्वत्रिक प्रगतीचे ध्येय गाठू शकले असते. कित्येक दशके सुरू असलेला हा संघर्ष अजूनही संपलेला नाही आणि नजीकच्या भविष्यात तो पुरता संपुष्टात येईल असेही छातीठोकपणे सांगता येत नाही. म्हणूनच, संवेदना जिवंत ठेवण्याचे काम सातत्याने करावे लागते. अनेक जण ते काम कृतीतून करत असतात, तर काही जण केवळ उक्तीतूनच समतेची स्तोत्रे गात राहतात. तसे पाहता, ऊठसूठ शाहू-फुले-आंबेडकरांचे केवळ उक्तीतून स्मरण करत राहणे हा सामाजिक सुधारणांच्या डोंगराएवढ्या आव्हानातला केवळ एक हिमनगाच्या वरच्या भागाचा किरकोळ कोपरा असतो, पण तो कोपरा कायम झगमगाटात राहील आणि त्यामुळे समाजाचे डोळे दिपलेले राहतील याची पुरेपूर काळजी घेतली जात असल्याने असे नामजप करणे म्हणजेच सामाजिक समतेचा पुरस्कार करणे असते असे वाटू लागते आणि समाज संभ्रमित होतो. त्यामुळे समानतेच्या मूळ जबाबदारीचा विसर पडू लागतो आणि केवळ समतेच्या परंपरांची स्तुती करणाऱ्या पोवाड्यांचे सूर सर्वत्र घुमत राहतात. अर्थात, समतेचा हुंकार सातत्याने उमटत राहणेदेखील समाजास जागरूक ठेवण्याच्या कामी महत्त्वाचेच असल्याने महाराष्ट्राने त्याचा कधीच अनादरही केलेला नाही, उलट सुधारकांच्या कामाची केवळ आठवण करून देत राहणाऱ्यांनाही सुधारकांच्या रांगेत बसवून त्यांचा सन्मानच केला गेला. म्हणूनच, महाराष्ट्राच्या सुधारक परंपरेची पताका कायम फडकत राहिली आहे, ही बाब अगदीच अमान्य करता येणार नाही. त्यामुळेच, कधी कधी अशा जाणिवा काहीशा विलंबाने जाग्या झाल्या, तरी त्या कायमच्या पुसल्या गेलेल्या नाहीत याची खात्री पटते आणि महाराष्ट्रासारख्या पुरोगामी, प्रगतिशील विचारांच्या राज्याला ते शोभादायक नाही याची खंत व्यक्त केली जाते. तशी प्रामाणिक कबुली देण्याचा मोठेपणा दाखविणे हादेखील एक सुसंस्कृत समाजाच्या लक्षणांचाच एक भाग असतो.



महाराष्ट्राच्या सरकारने अलिकडेच तशी एक कबुली देऊन आपल्या समंजसपणाची साक्ष समाजास दिली आहे. दोन दिवसांपूर्वी, ९ ऑक्टोबर रोजी, राज्याच्या ग्रमाविकास खात्याने एक शासन निर्णय जारी केला. राज्याच्या ग्रामीण भागात आजही अनेक रस्ते, वाड्या, वस्त्यांना जातिवाचक नावाने ओळखले जाते. अनेक दशकांपासून त्यांच्या ओळखीवर जातिवाचक उल्लेखाचा शिक्का कायमचा बसलेला आहे. सामाजिक सुधारणांचा विचार देशात पसरवून परिवर्तनाचे पर्व आणण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या महाराष्ट्राला याची कधीपासूनच खंत वाटत होती. त्यामुळेच, राज्यामधील शहरांतील व ग्रामीण भागांतील अनेक गावांची, वस्त्यांची व रस्त्यांचीही वर्षानुवर्षांपासून असलेली जातिवाचक नावे कायमची पुसून त्याऐवजी अशा गावे, वस्त्या व रस्त्यांना लोकशाही मूल्यांशी जोडणारी किंवा आपल्या सामाजिक, राजकीय कर्तृत्वातून इतिहास निर्माण करणाऱ्या महापुरुषांची नावे देण्याचा हा विचार तसा अगदीच कालपरवाचा नाही. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील वेगवेगळ्या सरकारांना ही बाब बोचत होती. याआधीही सरकारने याची अनेकदा नोंदही घेतली होती आणि अशी नावे बदलण्याचे निर्णयही जारी केले होते. आता पुन्हा, अनेक वर्षांनंतर महाराष्ट्राचे सरकार यावर काही निश्चित निर्णय घेण्याच्या व ठोस कार्यवाहीच्या मानसिकतेत आले आहे, असे नव्या निर्णयावरून दिसते. आजवर हा विचार कृतीत आणण्यात काही तांत्रिक अडथळेदेखील आले होते. अर्थात, कोणत्याही सकारात्मक बाबीची अंमलबजावणी करताना असे अडथळे येतही असतात. सरकार ही तर नियमांच्या चौकटीमध्ये बांधली गेलेली व्यवस्था असते. मनात आले म्हणून लगेच ते अंमलात आणले असे सरकारला करता येत नाही. त्यासाठी सर्व नियमांनी आखून दिलेल्या प्रक्रिया पार पाडाव्या लागतात, आणि तसे झाल्याची खात्री झाल्यानतंरच अंमलबजावणीची कार्यवाही सुरू होते. कदाचित त्यालाही काही काळ द्यावा लागतो. कदाचित त्यामुळेच, वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या निर्णयांचे आदेश जारी होऊनही ते कार्यवाहीच्या टप्प्यापर्यंत पोहोचण्यास विलंब झाल्यामुळे अनेक महत्त्वाचे निर्णय रखडलेलेही दिसून येत असतात. रस्ते, गावे आणि वाड्या-वस्त्यांची जातिवाचक नावे बदलून त्याऐवजी महापुरुषांची किंवा लोकशाही मूल्यांची जपणूक करणारी नावे देण्याचा विचारही बहुधा याच प्रक्रियेत अंमलबजावणीची प्रतीक्षा करत दीर्घकाळ रखडला असावा, हे या नव्याने जारी करण्यात आलेल्या नव्या शासन निर्णयातील सरकारच्या प्रांजळ कबुलीतून स्पष्ट होते. नवा शासन निर्णय जारी झाला असला, तरी अशी नामांतरे करून जातिवाचक नावांऐवजी नवी नावे देण्याबाबतच्या कार्यवाहीचीदेखील एक प्रशासकीय पद्धती आहे. या निर्णयानुसार, असा नामबदल करण्याची कार्यवाही शहरी भागात नगरविकास विभागाने व ग्रामीण भागात ग्रामविकास विभागाने विहित कार्यपद्धतीनुसारच करावयाची असते. मात्र, गावाचे नाव बदलण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येते, ही बाब स्पष्ट झाल्यानंतर नव्या निर्णयाद्वारे काही खुलासे करण्यात आले. राज्याच्या ग्रामीण भागातील केवळ वस्त्यांची आणि रस्त्यांची नावे बदलून नवी नावे देण्याच्या कार्यवाहीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. एखाद्या वस्तीचे किंवा रस्त्याचे असे नामांतर करावयाचे असल्यास संबंधित गावाने ग्रामसभेत तसा ठराव संमत करून त्याबाबतचा प्रस्ताव संबंधित गटविकास अधिकारी यांच्याकडे सादर करावा व गटविकास अधिकाऱ्यांनी तो तपासून संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पाठवावा. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तो तपासून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवावा व आलेल्या संबंधित प्रस्तावास जिल्हाधिकाऱ्यांनी अंतिमत: मंजुरी द्यावी अशी त्रिस्तरीय व्यवस्था नव्या निर्णयाद्वारे करण्यात आली आहे. वरवर पाहता, शासकीय कार्यपद्धतीच्या तपासणीच्या चाळणीतून जाताना असे प्रस्ताव रखडण्याची भीती असली, तरी त्यापलीकडे जाऊन या नव्या कार्यपद्धतीचे एक वेगळेपण लक्षात घ्यावयास हवे. ते म्हणजे, असे निर्णय घेण्याची प्रक्रिया केवळ शासनाच्या स्तरावर पार पाडली जाणार नाही, तर गावकऱ्यांच्या सहभागातून यासंबंधीच्या कार्यवाहीची सुरुवात होईल अशी शासनाची भूमिका यामध्ये स्पष्टपणे उमटलेली दिसते. जातिवाचक नावांमधून दिसणारी सामाजिक विषमतेची मुळे उपटून काढण्याची मानसिकता नागरिकांत रुजावी आणि तेथून उगवलेल्या नव्या समतेच्या विचाराच्या रोपट्यास शासनाने बळ द्यावे हा या प्रक्रियेमागचा हेतू दिसतो. महाराष्ट्राच्या समानतेच्या चळवळीच्या प्रदीर्घ वाटचालीच्या वैचारिक बांधिलकीची जाणीव जागी करणाऱ्या या निर्णयाची अंमलबजावणी जेव्हा होईल, तो राज्याच्या सामाजिक समतेच्या क्रांतीचा पुढचा टप्पा ठरेल, यात शंका नाही.

याअगोदरही, राज्य सरकारने हाच निर्णय पाच वर्षांपूर्वी जारी केला होता. त्यानंतर एप्रिल २०२१ मध्ये त्यासंबंधीचे एक परिपत्रकही जारी केले गेले आणि तेव्हाही या निर्णयाची राज्यातील अनेक माध्यमांनी दखल घेतली होती. सामाजिक समतेच्या या नव्या प्रयत्नांचे तेव्हाही सार्वत्रिक स्वागतच झाले होते. आता पुढच्या चार वर्षांनंतर पुन्हा या प्रयत्नांना नवा वेग आला आहे, असे दिसते. तरीही या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासकीय यंत्रणांनीच घ्यायला हवी. अन्यथा, ग्रामसभेकडून प्रस्ताव आला नाही असे कारण देत यंत्रणा हातावर हात घेऊन स्वस्थ राहिल्या, तर तेदेखील शोभादायक ठरणार नाही. महाराष्ट्र हे प्रगतिशील, पुरोगामी विचारांचे राज्य आहे, असा निर्वाळा अनेक जण वारंवार देत असतात. मात्र, अनेकदा पुरोगामित्वाच्या या विचारांनीही शरमेने मान खाली घालावी अशा घटनादेखील या राज्यात घडतात. जेव्हा जेव्हा असे काही घडते, तेव्हा तेव्हा या वाक्याचा पुनरुच्चार होतो. आता पुरोगामी विचार केवळ उच्चारापुरते न ठेवता ठोस कृतीत आणण्याची वेळ आली आहे, हे या नव्या निर्णयावरून दिसते. कारण, राज्यात आजही जातिवाचक नावे असलेली गावे, वाड्या, वस्त्या आणि रस्तेदेखील अस्तित्वात असणे ही राज्याच्या सामाजिक चळवळींच्या इतिहासास आणि पुरोगामी विचारांच्या परंपरास लज्जास्पद बाब आहे, याची कबुली देत खुद्द राज्य सरकारनेच या निर्णयात खंत व्यक्त केली आहे. राज्यात जातीय सलोखा निर्माण होऊन सामाजिक सौहार्दाचे नवे पर्व सुरू व्हावे आणि राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होऊन लोकशाही सुदृढ व्हावी ही सरकारची इच्छा आहे. त्याला बळ देण्यासाठी समाजाने पुढाकार घ्यायला हवा आणि समाजाच्या भावनांचा सरकारने आदर करावयास हवा, अशा दुहेरी परिणामांच्या प्रक्रियेचा प्रारंभ झाला आहे.

आता ज्या गावांत, शहरांत, वाडी-वस्त्यांमध्ये आणि रस्त्यांवर अशी जातिवाचक नावे असतील तेथून ती पुसून काढण्याचे काम ग्रामसभांना करावे लागेल. म्हणजेच, गावाने आपल्या प्रगती व पुरोगामी विचारांच्या परंपरांचा सन्मान करावयाचा आहे. गेल्या अनेक दशकांपासून सुरू असलेल्या समाजसुधारणांच्या संस्कारांनी समंजस झालेल्या समाजास ही फारशी अवघड बाब नाहीच, उलट याआधीही असा निर्णय होऊनही त्याची अंमलबजावणी का झाली नाही याचा अंतर्मुखपणे विचार करावा लागेल. या निर्णयाचा आदेश राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचला आहे. तेथून तो गटविकास अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचेल, त्यांच्यामार्फत गावागावांना त्याची माहिती दिली जाईल आणि अशा, जातिवाचक नावे असलेल्या जागांच्या नव्या नामकरणाचे सोहळे सुरू होतील अशी अपेक्षा करावयास हरकत नाही. कारण सामाजिक सुधारणाच्या प्रक्रियेत अग्रेसर राहणे हा महाराष्ट्राच्या परंपरेचा पायंडाच आहे.

जातिभेद हे सामाजिक विषमतेचे मुख्य कारण आहे. म्हणजे, समतेच्या चळवळीतील तो सर्वांत मोठा अडथळा आहे. त्यामुळेच, महाराष्ट्राच्या समतेच्या चळवळीचा प्रारंभच जातिभेद मिटविण्याच्या संस्कारातून सुरू झाला होता. किंबहुना, महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास हा समतेच्या शोधाचा इतिहास आहे, असेच म्हटले जाते. जातिभेद, अंधश्रद्धा आणि महिलांना उपेक्षित वागणूक देण्याच्या मानसिकतेविरुद्ध उभ्या राहिलेल्या सामाजिक चळवळींनी महाराष्ट्राला आणि देशाला नवी दिशा दिली. या चळवळीच्या केंद्रस्थानी महात्मा फुले हे नाव अधिक उजळपणे उमटले, कारण त्यांच्या समतेच्या विचारांचा वारसा घेऊनच पुढे अनेक सुधारकांनी या चळवळीस नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. समाजात शूद्र, अतिशूद्र वर्ग म्हणून गणल्या जाणाऱ्या वर्गाच्या श्रमांवर समाज प्रामुख्याने उभा असतानाही, १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत या वर्गास सामाजिक सन्मान नव्हता. त्या वर्गाची सर्व क्षेत्रांत उपेक्षाच होत होती, त्यामुळे समाजास सरसकटपणे होणाऱ्या अनेक लाभांपासून हा समाज वंचितही राहिला होता. याविरुद्ध पहिला आवाज महात्मा फुले यांनी उठविला. या वर्गावरील अन्यायाविरुद्ध उभे राहण्यासाठी शिक्षण, संघटना आणि वैचारिक संघर्षासाठी सज्ज होण्याची मानसिकता समाजात रुजविण्याचे काम अनेक सुधारकांनी केले. त्या अर्थाने महात्मा फुले हे भारताच्या सामाजिक धर्मनिरपेक्षतेच्या विचाराचे आरंभकर्ता ठरले आणि न्यायमूर्ती रानडे, गोपाळराव आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदींनी त्यांचे कार्य पुढे नेले. महात्मा फुले यांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला, ती जाणीव मनामनात रुजविली, असे डॉ. आंबेडकर म्हणत असत. केवळ धार्मिक किंवा नैतिक समता नव्हे, तर आर्थिक, सामाजिक व राजकीय समतेच्या चळवळीही त्यातूनच उभ्या राहिल्या. शिक्षण हे समतेचे सर्वांत सक्षम साधन आहे, ही जाणीव रुजविली गेली आणि शिक्षणप्रसाराची चळवळही त्यातूनच उभी राहिली. जातिवादी संस्कार, अंधश्रद्धा आणि लैंगिक विषमतांवर प्रहार केल्याखेरीज समतेची मानसिकता निर्माण होणार नाही, हा या चळवळींचा वैचारिक पाया राज्यात एव्हाना भक्कम झाला आहे. आता केवळ गावे, वाड्या, वस्त्या आणि रस्त्यांवर नावांच्या रूपाने उरलेले अवशेष नामशेष करावयाचे आहेत. सरकारला त्याची जाणीव झाली, हे चांगलेच झाले!

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### वाहनांच्या पांढऱ्या एलईडी दिव्यांचा त्रास

आजकाल कोणताही मनुष्य विनावाहन फिरू शकत नाही. मग ती सायकल असो किंवा चारचाकी वाहन असो. परंतु गत काही वर्षांत बहुतेक सर्वच वाहनांना पांढऱ्या रंगाचे एलईडी दिवे लावण्याचे प्रमाण वाढले आहे. हल्ली तर कंपनीतूनच असे दिवे लावले जातात. शहरी भागात रस्त्यांवर उत्तम स्ट्रीटलाईटची व्यवस्था असते. त्यामुळे शहरी रस्त्यांवर वाहने चालवताना वाहनाचे दिवे डिप्परवर ठेवून वाहने चालवायला हवी. परंतु बहुतांश लोक आपल्या वाहनांचे दिवे अप्परवर ठेवून वाहने चालवताना आढळतात. त्यामुळे डोळे दिपल्याने समोरून येणाऱ्या वाहनाच्या चालकाला काही वेळपर्यंत पुढचे काही दिसेनासे होते. पांढऱ्या एलईडी दिव्यांचा प्रकाश अतिशय प्रखर असतो. त्याच्या उजेडात तर काही क्षणांसाठी अक्षरशः अंधपणा आल्यासारखे होते. पुढचा रस्ता अजिबात दिसत नाही. त्यामुळे रात्रीच्या वेळी रस्त्यांवरील अपघातांमध्ये प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते. अशा प्रखर प्रकाशाचा त्रास केवळ समोरच्या वाहनचालकालाच होतो असे नाही, तर पायी चालणाऱ्यांनाही याचा त्रास होतो. एक तर शहरातील पदपथ दुकानदारांनी गिळंकृत केले आहेत. त्यामुळे पायी चालणाऱ्याला रस्त्यावरूनच चालणे भाग पडते. दुसरे म्हणजे कित्येक दुचाकी वाहनचालक चुकीच्या दिशेने वाहन चालवतात. त्यात प्रखर उजेडामुळे समोरचे काहीच दिसत नसल्याने पादचाऱ्यांना अपघाताला सामोरे जावे लागते. अशा अपघातांना केवळ मनुष्य प्राणीच जबाबदार आहे. मुळात सरकारने कायदा करून अशा एलईडी दिव्यांच्या उत्पादनावरच बंदी घालणे आवश्यक आहे. तसेच रात्री अनावश्यकपणे अप्पर स्थितीत वाहन चालवणाऱ्यांवर कडक कारवाई ताबडतोब करून अशा प्रकरांना आळा घालणेही आवश्यक आहे. संबंधित विभागांकडून तसेच वाहतूक मंत्रालयाकडून कारवाईची अपेक्षा आहे.

**चारुदत्त शेंडे**/९४२२३१५३१८

### लहान गोष्टींमधूनही देशसेवा घडते

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमीच्या कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी भाषणात अनेक मुद्दे मांडलेत. त्यात ते म्हणालेत, मला माझा देश जसा हवा असेल तसे मी वागायला हवे. खरेच आहे, आपल्याला आपले घर जसे नीटनेटके, स्वच्छ हवे पण घराबाहेर सार्वजनिक ठिकाणी गेल्यावर मात्र आपण आपला देश ही भावना विसरून जातो. आपण नागरी कर्तव्याचे किती पालन करतो हा प्रश्न प्रत्येकाने स्वत:ला विचारायला हवा. काही समाजसेवी संस्था अथवा नागरिक अपवाद वगळता कुठेही रस्त्यावर रॅपर फेकणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, रेल्वेत बसल्याजागी कचरा करणे आणि खाली टाकून देणे, खिडकीतून प्लॅस्टिक कचरा आणि बाटल्या फेकणे आणि त्याची कसली खंत न बाळगणे ही कामे सुशिक्षित, अशिक्षित कोणत्याही प्रकारचे लोक भारतात करतात. परत आपल्या सर्व प्रकारच्या असुविधांबद्दल सरकार कसे दोषी आहे ही तक्रार करायला आपण मोकळे.

कुठलाही देश महाशक्ती होण्यासाठी देशाच्या सामान्य नागरिकांचा वाटा फार महत्त्वाचा असतो. प्रत्येकाने स्वत:पुरते जरी ठरवले की समुद्रकिनाऱ्यावर, रस्त्यावर, नदीकिनाऱ्यावर, गडकिल्ल्यांवर गेल्यावर मी स्वच्छता राखेन, भ्रष्टाचारमुक्त देश हवा असल्यास पैसे देणार, घेणार नाही. स्वदेशीचा वापर, वाहतुकीचे नियम, सेनेबद्दलचा अभिमान, देशाच्या न्यायव्यवस्थेवर विश्वास, परदेशात गेल्यावर माझ्या देशाचे नाव उंचावेल या सर्व गोष्टींसाठी मी जागरूक राहीन, या छोट्या छोट्या गोष्टी संपूर्ण देशाची प्रतिमा उंचावतील. आपल्याला प्रत्येकाला प्रत्यक्ष सीमेवर लढता येणे शक्य नाही परंतु सद्वर्तन करेन, कायदा पालन करेन, सरकारच्या चांगल्या योजनांना मोडता न घालता पाठिंबा देईन, मतदान करेन एवढे केल्यास तीही देशसेवाच ठरेल.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### स्वदेशी वस्तूंची खरेदी आत्मनिर्भरतेच्या दिशेने पाऊल

दिवाळी म्हणजे आनंद, प्रकाश आणि नव्या सुरुवातीचा सण. प्रत्येक घरात या काळात नवीन खरेदी, सजावट, भेटवस्तू आणि मिठाईची रेलचेल असते. पण या वर्षीचा सण अधिक अर्थपूर्ण ठरू शकतो जर आपण स्वदेशी खरेदीचा संकल्प केला तर. भारतीय बाजारपेठेत आज परदेशी वस्तूंची भरपूर चलती आहे. मोठ्या ब्रॅण्ड्सच्या चमकदार जाहिराती आपल्याला आकर्षित करतात, पण या चमकोगिरीखाली लहान उद्योजक, कारागीर आणि स्थानिक व्यावसायिकांची मेहनत अनेकदा झाकोळली जाते. या दिवाळीत जर प्रत्येकाने आपल्या गावातील, जिल्ह्यातील किंवा राज्यातील लहान उत्पादकांकडून वस्तू खरेदी केल्या तर केवळ आर्थिक देवाणघेवाण नव्हे, तर रोजगार निर्मितीही घडेल.

स्वदेशी वस्तू खरेदीचे अनेक फायदे आहेत. लघुउद्योगांना बळकटी : स्थानिक उत्पादकांकडून खरेदी केल्याने त्यांचा व्यवसाय टिकून राहतो. आपल्या पैशातून आपल्या देशातील लोकांना काम मिळते. गुणवत्ता आणि संस्कृतीचे जतन, स्थानिक कारागिरांच्या हातून तयार झालेल्या वस्तूंमध्ये भारतीय परंपरेचा स्पर्श असतो. आयातीत वस्तूंऐवजी स्वदेशी खरेदीने देशाची अर्थव्यवस्था मजबूत होते. दिवाळीच्या या पवित्र सणात घर सजवताना, भेटवस्तू देताना आणि नव्या गोष्टी घेताना मेड इन इंडिया लेबल शोधा. हे केवळ उत्पादनाचे नाव नसून, आत्मनिर्भर भारताची ओळख आहे. या दिवाळीत प्रकाशाचा सण स्वदेशी खरेदीच्या दीपांनी उजळवूया. स्वदेशी वस्तू घ्या, स्वदेशी विचार जगा आणि आपल्या देशाच्या प्रगतीत हातभार लावा.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

### ‘मनाचे श्लोक’ नावाचा गैरवापर?

आगामी मराठी चित्रपट ‘मनाचे श्लोक’ या चित्रपटाचा ट्रेझर प्रदर्शित झाला आणि सर्वत्र संतापाची लाट पसरली. चित्रपटाचे नाव बदलावे अशी मागणी हिंदू जनजागृती समिती, सज्जनगड ट्रस्ट आणि विविध संघटना तसेच श्री समर्थ भक्तांकडून होऊ लागली. ते स्वाभाविकच आहे. कारण महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. त्यांच्या श्लोक, अभंगातून समाजाला दिशादर्शन होत असे. संत स्वत: कष्ट सहन करून जगाच्या कल्याणासाठी झटत असतात. ‘‘जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती देह कष्टविती परोपकारे’’ अशी महाराष्ट्राची संतपरंपरा. याच महाराष्ट्रात श्री समर्थ रामदास स्वामी यांनी मनाची चंचलता आणि त्याला स्थिरता आणण्यासाठी मनाच्या श्लोकातून सोप्या भाषेत प्रबोधन केलेले आहे. या पवित्र आणि मार्गदर्शक धार्मिक ग्रंथाच्या नावाचा वापर करून त्याच नावाने मराठी चित्रपटाची निर्मिती करणे, हा हिंदूंच्या श्रद्धेचा बाजार मांडण्यासारखा प्रकार आहे. उच्च नैतिक मूल्ये शिकवणाऱ्या या ग्रंथाचे नाव केवळ मनोरंजन, व्यावसायिक लाभ आणि सवंग प्रसिद्धी यासाठी वापरणे, हा कोट्यवधी श्रीरामभक्त आणि समर्थभक्तांच्या धार्मिक भावनांचा अवमान आहे. संतपरंपरेचा हा अवमान हिंदू समाज कदापि सहन करणार नाही. राज्य आणि केंद्र सरकाने भक्तांच्या भावनांचा विचार करून योग्य कारवाई करावी आणि चित्रपटाच्या निर्मात्यांनी जनभावनेचा आदर राखून शीर्षक बदलावे, अशी जनतेची रास्त अपेक्षा आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

## दखल

हर्षदा मशानकर

# कलेची भारतीय दृष्टी जागवणारा संस्कार भारती कलासाधक संगम

‘मनुष्यप्राण्याला’ मनुष्यत्व प्रदान करणाऱ्या साहित्य-संगीतादी ललित कलांचे संवर्धन व कलाकारांना प्रोत्साहन देणाऱ्या संस्कार भारतीच्या विदर्भ प्रांताचा कलासाधक संगम वर्धा नगरीत ४ व ५ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. अनेकान्त स्वाध्याय मंदिरातील या कलासंगमात संगीतकार कौशल इनामदार, सुप्रसिद्ध चित्रकार पद्मश्री वासुदेव कामत यांच्यासह दिग्गज कलासाधकांच्या सादरीकरणाने रसिकांना सचैल स्नान घडले. कार्यक्रमाचे पूर्व व पूर्ण नियोजन, व्यवस्थापन, सत्ररचना, कामांची विभागणी, त्यासाठीच्या बैठकी सगळेच अनुकरणीय आणि वाखाणण्याजोगे होते.

कलासाधक संगमामध्ये पोर्ट्रेटसह विभिन्न प्रकारच्या रांगोळ्या, चित्रे, भारतीय वाद्ये, छायाचित्रे, पुरातन नाणी, टेराकोटा आणि सजावटीच्या वस्तूंच्या प्रदर्शनाचे आयोजन होते. विदर्भातील रांगोळी कलाकारांनी रात्री जागून रांगोळ्या पूर्ण केल्या. वर्धा जिल्ह्यातील गांधीजी, विनोबा, डॉ. धर्मपाल, दत्तोपंत, जमनालालजी इ. महनीय व्यक्तींची चित्रेही रांगोळीद्वारे रेखांकित करण्यात आली होती. कालियामर्दन, शिवराज्याभिषेक, श्रीरामकथाचित्रे, पिंपळाच्या पानाच्या जाळीवरील चित्रे, एकापेक्षा एक सरस! शिवाय कॅन्डिड छायाचित्रे आकर्षून घेत होती. तबला, बोंगो, कोंगो, मॅडोलिन, व्हायोलिन, गिटार, स्वरमंडल, सॅक्सोफोन इ. वाद्यांसह २५०० वर्षांपासूनचे शिक्के, नाणी लक्षवेधी ठरले. टेराकोटाच्या वस्तू, दागिने, घरसजावटीच्या वस्तू यांचाही समावेश होता.



दरम्यान, कलासाधक संगमचे औपचारिक उद्घाटन ४ ऑक्टोबर रोजी सुप्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार यांच्या हस्ते झाले. संस्कार भारतीचे अखिल भारतीय संघटनमंत्री अभिजित गोखले, अ. भा. मंत्रिद्वय रवींद्र बेडेकर व आशुतोष अडोणी, पश्चिम क्षेत्रप्रमुख चंद्रकांत घरोटे, प्रांताध्यक्ष कांचन गडकरी, प्रांत महामंत्री विवेक कवठेकर, स्वागताध्यक्ष हरिभाऊ वझूरकर, वर्धा जिल्हाध्यक्ष सतीश बावसे व ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. राम मोहन बेंदूर यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. दीप प्रज्वलन व नटराज पूजनाने हा देखणा सोहळा प्रारंभ झाला. स्वाती भालेराव यांच्या मार्गदर्शनात व सचिन डंभारे आणि सोनाली मंथनवार यांच्या नृत्य दिग्दर्शनात ध्येय गीतातील विविध कडवी कथक, भरतनाट्यम्, ओडिसी आणि मोहिनीअट्टम या प्रकारात बांधून नृत्यसंगम साधला.

वर्धा जिल्हाध्यक्ष सतीश बावसे यांच्या स्वागतपर संबोधनानंतर डॉ. राममोहन बैंदूर यांचा सन्मान करण्यात आला. प्रांताध्यक्ष कांचन गडकरी यांनी यावेळी आपल्या मनोगतात, कलेच्या माध्यमातून भारताला नवजीवन प्राप्त करून देण्यासाठी संस्कार भारती कार्यरत असल्याचे सांगितले.

संस्कार भारतीचे अखिल भारतीय संघटन मंत्री अभिजित गोखले यांनी आपल्या उद्बोधनात, भारतीय मातीतून आलेला व श्रेष्ठ तत्त्वचिंतकांनी मांडलेला ‘स्व’चा विचार कलेच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य संस्कार भारती करीत असल्याचे सांगितले. या सोहळ्याचे संचालन स्मिता खनगई यांनी केले. ‘बालगंधर्व’ फेम संगीतकार कौशल इनामदार यांची आसावरी देशपांडे आणि पल्लवी पुरोहित यांनी घेतलेली प्रकट मुलाखत हा एक आनंदानुभव होता. लेखनासाठी कौशलजींनी १०० नाटके अभ्यासली, यातून हेच सिद्ध होते. ग्रेसांच्या कवितेचा अनुभव सांगताना ते म्हणाले, चाल लावण्याच्या प्रक्रियेतच कविता समजत जाते. सुरेश भटांचं ‘लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी’ हे मराठी अभिमान गीत साकारतानाची धडपड त्यांनी रंजकपणे मांडली. यामध्ये ११२ प्रस्थापित गायक, ३५६ कोरस कलाकार आणि वादक, तंत्रज्ञ अशा एकूण ५४३ कलाकारांच्या सहभाग त्यांनी घडवून आणला.

शेवटच्या सत्रात आशुतोष अडोणी लिखित व दीपाली घोंगे दिग्दर्शित ‘भारते नवजीवनम्’ ही लघुनाटिका प्रस्तुत केली. त्यात जीवनातील कलेचं महत्त्व अतिशय प्रभावीपणे मांडले. दुसऱ्या दिवसाचा प्रारंभ अतिशय सुरेल झाला. प्रांत कार्याध्यक्ष सुधाकर अंबुसकर यांच्या संयोजनात अहिरभैरवची बंदिश सतारीवर योगेश बोडे अमरावती, संवादिनीवर अमोल झाडे वर्धा, व्हायोलिनवर अथर्व भालेराव नागपूर तर तबल्यावर श्याम सरोदे वर्धा आणि गायिका डॉ. प्राजक्ता हसबनीस खामगाव यांनी सुरेख रंगवली.

प्रभात रागानंतर जागतिक दर्जाचे चित्रकार तथा संस्कार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष पद्मश्री वासुदेव कामत यांची ‘मर्यादा पुरुषोत्तम राम’ ही संकल्पना चित्रमालिका व त्यावरील निरूपण हा अप्रतिम कार्यक्रम झाला. यावेळी रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह भय्याजी जोशी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते कामतांचा सत्कार करण्यात आला. ‘स्वरनिनाद’ या सत्रामध्ये विदर्भातील विविध कलासाधकांनी आपापले सादरीकरण केले. संचालन सहमहमंत्री गजानन रानडे यांनी केले. समारोपप्रसंगी मंगेश परसोडकर यांनी व्यवस्थेतील सर्वांचा परिचय करून दिला. उदय लाडसावंगीकर यांनी वैयक्तिक गीत म्हटले. अखिल भारतीय मंत्री आशुतोष अडोणी यांनी मार्गदर्शन केले. पसायदानाने सोहळ्याची सांगता झाली.

८२३७८२१४४९

### आठवी पूजनाचे महत्त्व



आश्विन महिन्यात साजरी केली जाणारी कालाष्टमी ही कराष्टमी म्हणूनही ओळखली जाते. विदर्भात आश्विन महिन्यात, दिवाळीच्या आठ दिवसाआधी विशेष कालाष्टमी साजरी केली जाते. या दिवशी केल्या जाणाऱ्या पूजेला विदर्भातील बोली भाषेत आठवी मातेची पूजा असेही म्हणतात. २०२५ म्हणजे यावर्षी १३ ऑक्टोबर या दिवशी विदर्भात आठवी आहे.

कालाष्टमीला घरोघरी आठवी पूजन केले जाते. यात सुगड्यांची पूजा होत असून प्रसाद म्हणून आंबिल तयार करतात. यादिवशी घरातील सर्व महिलांसह पुरुष देखील उपवास करतात. बाजारामधून ज्वारीचे धांडे आणून पूजेदरम्यान तिची झोपडी तयार केली जाते. पाटावर नवीन कापड टाकून, त्यावर आठ किंवा नऊ मातीचे सुगडे ठेवण्यात येतात. त्या सुगड्यांमध्ये लाह्या, शिंगाडे, सीताफळ इत्यादी पदार्थ टाकून त्यावर मातीचे झाकण ठेवले जाते. त्यानंतर देवीचे चित्र असलेला एक कागद ठेवून, त्यावर हळद-कुंकू व फुले वाहून पूजा केली जाते. यासह त्या सुगड्यांची देखील पूजा केली जाते. धूप-दीप लावून आरती केली जाते. या दिवशी ज्वारीच्या कण्यांपासून आंबिल तयार केली जाते आणि त्याचा नैवेद्य दाखविला जातो. तसेच चंद्र व सूर्य आकाराची साखर घालून पोळी केली जाते आणि त्याचा नैवेद्य दाखविला जातो. आठवी मातेचा उपवास केल्याने अनेक शारीरिक व्याधी नष्ट होतात, अशी मान्यता आहे. त्यामुळेच कुटुंबातील सगळेच सदस्य उपवास करतात आणि मिळून पूजा करतात. काही भाविक रात्रीच चंद्राची पूजा करून व नैवेद्य दाखवून उपवास सोडतात, तर काही भाविक दुसऱ्या दिवशी सूर्याला नैवेद्य दाखवून पूजा करतात आणि उपवास सोडतात. आठवी पूजेची प्रथा ही घरातील कुळाचारावर अवलंबून असते. या पूजेमुळे शारीरिक व्याधी दूर होतात आणि कुटुंब निरोगी राहते, अशी श्रद्धा आहे. ही पूजा दुर्गा देवीच्या महागौरी या आठव्या स्वरूपाशी संबंधित आहे, असेही मानले जाते.

**वर्षा आवदे**/नागपूर

## आजचे संघगीत-१०

रविवार, १२ ऑक्टोबर २०२५

### भक्तिपुर्ण हे अवघे जीवन

भक्तिपुर्ण हे अवघे जीवन  
मातृभुमिच्या पदमकमलाशी  
तेवत तेवत मधुभावाने  
एकरुप हो परमात्म्याशी ॥धृ॥

राष्ट्रसमर्पित जीवन जगणे  
सद् धर्माचे तेज फुलविणे  
या ध्येयास्तव अविरत श्रमणे  
जीवनपूजा ही अविनाशी ॥१॥

जागृत होता समष्टि शंकर  
दानवतेला मिळे न अवसर  
मंगलतेने गाता सुस्वर  
मीलन होइल चित्त तत्त्वाशी ॥२॥

साधना ही जीवनाची  
देवत्वाला जगविण्याची  
क्षणिकांतुनि त्या चिंतनाची  
वाट पुसावी भगवंताशी ॥३॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### ई-पीक पाहणीस ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्यात अतिवृष्टी, तांत्रिक अडचणी आणि नेटवर्क समस्यांमुळे अनेक शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी अपूर्ण राहिली होती. राज्य शासनाने आता या पाहणीस ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. महसूलमंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी सर्व कृषी सहाय्यकांना प्रत्यक्ष शेती बांधावर जाऊन ई-पीक पाहणी पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

ई-पीक पाहणी प्रणालीमुळे शेतकऱ्यांना पिकांची डिजिटल नोंदणी करता येते. शेतकऱ्यांनी मोबाईल पद्वारे शेतीची माहिती भरल्यानंतर महसूल अधिकारी ती ४८ तासांत मंजूर करतात आणि ती माहिती थेट सातबारावर दिसते. यामुळे विविध शासकीय कृषी योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळण्यास मदत होते. शेतकऱ्यांनी ३१ ऑक्टोबरपूर्वी ई-पीक पाहणी पूर्ण करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

### तामकळस येथे नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

**परभणी,/प्रतिनिधी :** सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे तामकळस (ता.पूर्णा) येथील ३३ वर्षीय शेतकरी डिगंबर तुकाराम तनपुरे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शनिवारी (दि. ११) सकाळी उघडकीस आली.

शेती पिकांचे नुकसान व एसबीआय बँकेचे घेतलेले कर्ज फेडता न आल्याने त्यांनी राहत्या शेतात गळफास घेतला. घटनेची माहिती मिळताच ठाणेदार गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गजानन काटेवाडे, नामदेव सुजलोड, संदीप साळवे, राहुल वडमारे, मनोहर पडोळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला व मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविला. या प्रकरणी मयताचा भाऊ दत्ता तुकाराम तनपुरे यांच्या फिर्यादीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक नामदेव सुजलोड हे करीत आहेत. मयताच्या पश्चात वडील, भाऊ, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.

### कर्जाच्या विवंचनेत तरुणाची आत्महत्या

**परभणी,/प्रतिनिधी :** सावरगाव (ता. मानवत) येथील २७ वर्षीय वैभव बाबासाहेब काळे या तरुणाने बँकेचे कर्ज फेडण्याच्या चिंतेतून विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी (दि. १०) सकाळी साडेसातच्या सुमारास उघडकीस आली.

ग्रामीण बँकेचे कर्ज झाल्याने तो काही दिवसांपासून तणावात होता. याप्रकरणी कठाळू परबतराव काळे यांच्या माहितीवरून मानवत पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

### पशुवैद्यक महाविद्यालयात जागतिक अंडी दिनानिमित्त अंडी जनजागृती कार्यक्रम

**परभणी,/प्रतिनिधी) :** विस्तार शिक्षण संचालक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली पशुवैद्यक व पशु विज्ञान महाविद्यालय, परभणी येथे जागतिक अंडी दिनानिमित्त १० ऑक्टोबर रोजी अंडी जनजागृती कार्यक्रमआयोजित करण्यात आला होता. महाविद्यालय स्तरावर तसेच विद्यापीठाच्या दत्तक गावांमध्ये गेल्या वर्षभरात अंडी जनजागृती अभियान मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आले असून, त्याच्या अनुषंगाने हा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुधीर राजूरकर होते, तर डॉ. चंद्रकांत मामडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सुरुवातीला सह-समन्वयक व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. काकासाहेब खोसे यांनी उपस्थितांना अंड्याविषयीचे गैरसमज दूर करून आहारातील त्याचे पोषणमूल्य स्पष्ट केले. नोडल अधिकारी डॉ. म्हाळसाकांत निकम यांनी ङ्गआहारातील अंड्यांचा समावेशफ या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, अंडी ही उच्च दर्जाचे आणि परवडणारी प्रथिनांची स्रोत असून त्यात कोणतीही भेसळ नसते. अंडी आणि दूध या दोन्हींत जैविक मूल्य जवळपास समान असल्याचे त्यांनी नमूद केले.

### राष्ट्रवादी युवक काँग्रेसतर्फे मोफत नेत्र तपासणी शिबिर

**परभणी,/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी युवक काँग्रेस शहर जिल्हा तर्फे आज शनिवारी (दि. ११) जनसंपर्क कार्यालय उद्घाटन सोहळा आणि मोफत नेत्र तपासणी तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते.

हा उपक्रम राष्ट्रवादी युवक काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष सचिन पाचपुंजे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी महापौर तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष प्रताप देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आले. उद्घाटनानंतर झालेल्या मोफत नेत्र तपासणी शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते आणि मित्रपरिवार उपस्थित होते.

### दिपावली सणानिमित्त बाजारपेठेत गर्दी

**परभणी,/प्रतिनिधी :** दिपावली हा सण अवघ्या काही दिवसावर आला असल्यामुळे बाजारपेठेत दिवे, आकाशदिवे, लाईटींग, पुले, प्रसाद, केळीचे पान, केळीचे खांब यासह अन्य साहित्यांनी बाजारपेठ उजळून निघाली आहे. तसेच किराणा दुकानावर नागरिकांनी आतापासूनच सामान खरेदीची तयारीही केली आहे. त्यातच वाढत्या खरेदीमुळे अनेक बाजारपेठेत आर्थिक उलाढाल वाढली आहे. सध्या पिकांचे देखील मोठे नुकसान झाले आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

**तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.**

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# कुऱ्हाडी गावात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग 'स्वच्छता हीच सेवा' उपक्रमातून बाजारपेठ उजळली

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी आणि मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान विशेष स्वच्छता मोहिम**

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर /प्रतिनिधी-** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून तालुक्यातील कुऱ्हाडी ग्रामपंचायतीच्या वतीने शनिवारी (दि. ११ ऑक्टोबर) विशेष स्वच्छता उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमात गावातील महिला मंडळींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत श्रमदानाच्या माध्यमातून गावातील बाजारपेठे सह सार्वजनिक परिसराची स्वच्छता केली.




स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने ग्रामपंचायत कुऱ्हाडी तर्फे प्रत्येक कुटुंबाला ओला व सुका कचरा वेगळा ठेवण्यासाठी प्रत्येकी दोन डस्टबिनचे वाटप करण्यात आले. यामुळे गावात कचरा व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध पद्धतीने होणार आहे. गावात दर रविवारी भरणाऱ्या बाजारपेठेतील कचरा इतर घाण साफ करून महिलांनी परिसर आकर्षक व स्वच्छ बनविला. ''स्वच्छता हीच सेवा'' या भावनेतून महिलांनी एकत्र येऊन श्रमदान केले. या उपक्रमामुळे गावात स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण झाली असून महिलांच्या पुढाकारामुळे ग्रामस्थांमध्ये आदर्श निर्माण झाला आहे.

या उपक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत कुऱ्हाडीच्या वतीने करण्यात आले होते. सरपंच रामकोर गोविंद राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीचे समन्वय सदस्य संतोष राठोड यांनी ग्रामस्थांना स्वच्छतेत सहभागी होण्याचे आवाहन केले होते. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच ग्रामपंचायतीतील सर्व सदस्यांनी समन्वय साधला. या मोहिमेत अंगणवाडी सेविका सुमनबाई राठोड, भारतीताई वाव्हळे, रामकोर चाफे, सुमन इंझे, अहिल्याबाई चाले, चंद्रकला चाफे, चातुराबाई पवार, धोंडाबाई चाफे, विमलबाई पवार, गीता पवार,




कौशल्या चव्हाण, रेखा चव्हाण, शोभाबाई आडे, आराध्या इंझे, सावित्रीबाई चव्हाण, शांताबाई राठोड यांच्यासह ग्रामपंचायतीतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

गाव स्वच्छतेच्या उपक्रमानंतर सर्व सहभागी महिलांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिवादन करून त्यांच्या विचारांचा वसा जोपासण्याचा संकल्प केला. तुकडोजी महाराज यांनी दिलेला ''स्वच्छ गाव, सुंदर गाव'' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून साकारल्याचा आनंद ग्रामस्थांनी व्यक्त केला. महिलांच्या पुढाकारामुळे गावात स्वच्छतेबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी नियमितपणे स्वच्छता राखण्याचा निर्धार या प्रसंगी व्यक्त केला.

### गाव स्वच्छ, सुंदर, आणि आर्दश ठेवण्याचा संकल्प- संतोष राठोड

**''राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून गावातील महिलांनी उत्साहाने सहभाग घेतल्याने स्वच्छतेबाबत एक उत्तम संदेश समाजात गेला आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून दर आठवड्याला अशा उपक्रमांचे आयोजन करून गाव स्वच्छ, सुंदर आणि आदर्श ठेवण्याचा आमचा संकल्प आहे.''**

**संतोष राठोड,**
**समन्वय सदस्य- ग्रामपंचायत कुऱ्हाडी**

### गावाची स्वच्छता ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी- सौ.रामकोर राठोड

**''गावाची स्वच्छता ही केवळ ग्रामपंचायतीची जबाबंदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. महिलांनी स्वखुशीने श्रमदान करून बाजारपेठ स्वच्छ केली, ही बाब संपूर्ण गावासाठी प्रेरणादायी आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' या विचारांना आमच्या ग्रामस्थांनी प्रत्यक्ष कृतीतून साकार केले आहे. आगामी काळातही अशा उपक्रमांची परंपरा कायम ठेवू.''**

**सौ. रामकोर गोविंद राठोड**
**सरपंच- ग्रामपंचायत कुऱ्हाडी**

### झरी जवळील आखाडयावर चोरटयांचा धुमाकूळ

**परभणी,/प्रतिनिधी-** तालुक्यातील झरी या गावाजवळ अज्ञात चोरट्यांनी शस्त्रास्त्रांचा धाक दाखवून एका आखाड्यावरुन महिलांच्या अंगावरील दागदागिणे लंपास केले. तसेच मोटारसायकलही पळवली.

जिंतूर ते झरी या रस्त्यालगत अनिल वटारे यांचे गट नंबर १०१४ या क्षेत्रातील शेतात आखाडा आहे. गुरुवारी रात्री १२ ते १ वाजेच्या सुमारास तीघा चोरट्यांनी आखाड्यावर येऊन गड्यास मारहाण केली. महिलांना शस्त्रास्त्रांचा धाक दाखवून ४ ग्रॅम सोन्याची पोत,३ ग्रॅम कानातील कुडके, ५ तोळ्याचे पायातील जोडवे तर ५ ग्रॅम कानातील झुंबर हिसकावून घेतले.

### दिवाळी सणानिमित्त कापड दुकानावर गर्दी

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील नामांकीत कापड दुकानावर ग्राहकांची कपडे खरेदीसाठी चांगलीच गर्दी होत असल्याचे चित्र गेल्या काही दिवसापासून पहावयास मिळत आहे.

दिवाळी हा सण अवघ्या काही दिवसावर आला असल्यामुळे आता ग्राहकांची नवीन कापड खरेदीसाठी तयारी सुरु असल्याचे दुकानाचे मालक सांगत आहेत.

### पंचायत समितीच्या गणाचे आज आरक्षण

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णा तालुक्यातील पंचायत समितीच्या गणाचे आरक्षण जाहीर करण्यासाठी सोमवारी १३ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजता पूर्णा तहसील कार्यालयात आरक्षणासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीला परभणी येथील उपजिल्हाधिकारी उदयसिंह भोसले यांचे उपस्थितीत आरक्षण सोडत जाहीर केली जाणार आहे तरी या बैठकीला राजकीय पक्षाचे पदाधिकारी लोक प्रतिनिधी यांनी उपस्थित राहण्याचे आव्हान तहसीलदार माधवराव बोथीकर निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार पंढरीनाथ शिंदे यांनी केले आहे पूर्णा तालुक्यातील पंचायत समितीच्या बारा गणाच्या आरक्षणाची सोडत जाहीर करण्यासाठी सोमवार दिनांक १३ नंबर रोजी दुपारी तीन वाजता पूर्णा येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहात दुपारी तीन वाजता परभणी येथील उपजिल्हाधिकारी उदयसिंह भोसले यांच्या प्रमुख असती विशेष बैठक बोलावून तालुक्यातील आरक्षण जाहीर केले जाणार आहे या अगोदर पूर्णा पंचायत समितीच्या सभापतीची आरक्षण परभणी येथे जाहीर झालेअसून आता गणाचे आरक्षण जाहीर केले जाणार आहे तरी या बैठकीला तालुक्यातील सर्व पक्षाचे पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे अहवाल तहसीलदार माधवराव बोथीकर नायब तहसीलदार पंढरीनाथ शिंदे यांनी केले आहे.

## भाजप तालुका अध्यक्ष गोविंद थिटे यांच्याकडून गृह उपयोगी भांडे वाटप जनतेच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर!

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यातील बोरी पासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या कॉलेज मुंडा या ठिकाणी आज मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या वतीने गृह उपयोगी भांडे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भाजप तालुका अध्यक्ष गोविंद थिटे यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते शेकडो महिला आणि पुरुषांना स्वयंपाकघरातील गृह उपयोगी भांडे कीट वाटप करण्यात आले. या भांडे वाटप कार्यक्रमात सहभागी झालेल्या महिला व पुरुषांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाचे हास्य झळकत होते. अनेक लाभार्थ्यांनी भाजप कार्यकर्त्यांचे आभार मानत ''अशा योजना सर्वसामान्यांच्या घरापर्यंत पोहोचतात म्हणूनच भाजपचा जनाधार वाढतोय'' अशी प्रतिक्रिया दिली.या



कार्यक्रमात बोलताना गोविंद थिटे म्हणाले ''विरोधकांना भाजपची लोकसेवा खटकते! ते म्हणतात की आम्ही 'फालतू लोकांना' भांडे कीट देतो. पण आम्हाला टीका नको आम्हाला जनतेची सेवा हवी आहे. विरोधक बोलत राहतील, पण आम्ही काम करत राहणार आहोत. जनतेसाठी काम करणं हाच आमचा धर्म आहे. त्यांच्या या वक्तव्यावर कार्यकर्त्यांनी जोरदार टाळ्यांचा कडकडाट केला. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती तालुका अध्यक्ष गोविंद थिटे,मंडळ अध्यक्ष अशोक शिंपले,आत्माराम पवार,सतीशराव चौधरी,ओंकार चौधरी, संभाजी चौधरी,प्रभाकर कदम, सचिन आढे,पवन पारवे, संतोषराव चौधरी, दिनकर चौधरी, पंडीत घोलप , संतोष माने,शेख वसीम , मुसवीर पठाण, शेख मुर्तुजा , गिरी गंगाधर, वाहिद पठाण ,सरपंच, उपसरपंच,भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच मोठ्या संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते.मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या पुढाकाराने आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

## अन्नधान्याऐवजी थेट रक्कम शेतकरी शिधापत्रिकाधारकांच्या बँक खात्यात जमा

**पूर्णा,/प्रतिनिधी-** तालुकयातील एपीएल शेतकरी शिधापत्रिकाधारक लाभार्थी योजनेअंतर्गत ज्या शेतक-यांच्या नावे सातबारा आहे व ज्यांना स्वस्त धान्य दुकानदारांकडून स्वस्त धान्य मिळत होते अशा लाभार्थ्यांसाठी शासनाकडून कुटुंबातील महिलांच्या नावे असलेल्या बँक खात्यात डीबीटी म्हणजेच घेट रक्कम हस्तांतरणद्वारे अन्नधान्यापोटी मिळणारी रक्कम जमा करण्याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात आलेला आहे.

पूर्णा तालुव्यातील एकूण ६९२७ कार्डधारक व लाभार्थी सदस्यसंख्या २९३४३ इतकी असून त्यापैकी एकूण ५३५० शिधापत्रिकांमधील एकूण २३२५२ इतक्या लाभार्थ्यांना माहे जुलै-२०२४ ते डिसेंबर-२०२४ या कालावधीतील प्रतिसदस्य १७० याप्रमाणे सहा महिन्याचे एकूण २,३७,१७,०४०/- (दोन कोटी सदतीस लाख सतरा हजार चाळीस रुपये) इतकी अनुदानाची रक्कम कार्डधारकांच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

तसेच ज्या उर्वरित १५७७ शेतकरी शिधापत्रिकाधारकांना अद्याप सदर योजनेअंतर्गत लाभमिळालेला नाही अशा लाभार्थ्यांनी आपले कुटुंबाचे राशन कार्ड, कुटुंबसदस्यांचे आधार कार्ड, महिला कुटुंब प्रमुखाचे नावे असलेले बँक पासबुक या कागदपत्रांच्या छायांकित प्रत व मोबाईल क्रमांकासह स्वस्त धान्य दुकानदार यांचेकडे अधवा पुरवठा विभाग तहसील कार्यालय, पूर्णा येथे जमा करण्याबाबतचे आवाहन तहसीलदार माधवराव बोधीकर, नायब तहसीलदार सतीश नाईक, पुरवठा निरीक्षक प्रदीप मोरे यांनी केले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते नागरे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बैठक संपन्न

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते सुरेश नागरे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बैठक संपन्न झाली.

दिनांक ११/१०/२०२५ वार शनिवार रोजी जिंतूर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सुरेश नागरे यांच्या निकटवर्तीय काही पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला होता. त्यामुळे सुरेश नागरे यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते असे असताना सुरेश नागरे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विविध कार्यकर्त्यांची बैठक पार पडली या बैठकीमध्ये सौ अमृता सुरेशराव नागरे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष लक्ष्मण बुधवंत, नाईक वाडे अण्णा,उस्मान पठाण माजी जिल्हा परिषद अध्यक्ष केशवराव बुधवंत ॲड सुनील बुधवंत, राजेश चव्हाण, भागवत



जोगदंड, राजेंद्र गाडेकर, गजानन वऱ्हाड, गुलाबराव चौधरी, अर्जुन वजीर, अनंतराव कोरडे,दिलीप माघाडे, माणिक हिंगे, अमित राठोड,हशम भाई, अन्शन लाला, रमेश काठोळे, विश्वनाथ गंगे, विनोद शिंदे, ऋषी अंभोरे, दादाराव गडदे, योगेश कंठाळे, संतोष खताळ, हनुमान सांगळे, भास्कर नागरे, संजय घुले,आदींनी आपण सुरेश नागरे यांच्या सोबत असून जे पदाधिकारी पक्षास सोडून गेलेत त्याने पक्षाला कुठलाही फरक पडणार नाही येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थे मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तालुक्यामध्ये नंबर एकचा पक्ष असेल अशा आशयाचे मनोगत व्यक्त केले. त्यानंतर अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना सुरेश नागरे यांनी सांगितले की गत विधानसभेला आपल्याला जवळपास ५६ हजार मतदान पडले तेव्हापासून कार्यकर्त्यांची फळी आपल्या सोबत आहे. जनतेची विकासाची कामे व्हावेत म्हणून आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश घेतला होता. व या पक्षप्रवेशाला पाच-सहा महिने होताच काही सहकार्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये पक्षप्रवेश केला याबाबत त्यांनी असे सांगितले की राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सत्तेतील पक्ष असून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आदरणीय अजितदादा हे कार्यकर्त्यांना बळ देणारे नेते म्हणून ओळखले जातात त्यामुळे आपण इतर कुठल्याही पक्षांमध्ये प्रवेश करू नये अशी त्यांची भूमिका होती परंतु त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचे न ऐकताच भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. या घटनेमुळे जिंतूरचे राजकारण ढवळून निघाले होते अशा परिस्थितीमध्ये श्री सुरेश नागरे यांनी असे सांगितले की आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आदरणीय अजित दादा पवार साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भविष्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षांमध्ये इतर कुठलाही मतभेद न ठेवता सर्वांना सोबत घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आणणार असल्याचे सांगितले या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आगामी नगरपालिका निवडणुकीच्या तयारीला लागा- आ. मुटकुळे

## हिंगोली, वसमत, कळमनुरी येथे भाजपची आढावा बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ आक्टोबर**

जिल्ह्यातील हिंगोली, वसमत आणि कळमनुरी या तीनही नगर पालिकेवर भाजपची सत्ता आणण्यासाठी भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी केले आहे.

भारतीय जनता पक्षाच्यावतीने रविवारी हिंगोली येथे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या निवासस्थानी आगामी नगर पालिका निवडणुकीसंदर्भात आढावा बैठक पार पडली. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, सरचिटणीस उमेश नागरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना आ. मुटकुळे म्हणाले की, हिंगोली नगर पालिकेवर भाजपचे नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्या काळात शहरातील रस्ते, भूमीगत गटारे, सांस्कृतीक सभागृहे, नवीन प्रशासकीय इमारत तसेच इतर सुविधा शहरात अस्तित्वात आल्या. राज्य सरकारकडून कोट्यावधी रूपयांचा निधी आणला. त्यातून शहराचा विकास केला. अनेक वर्षापासून जलेश्वर तलाव सौंदर्यीकरणाचा प्रश्न भाजपच्या काळात आणि आपल्या पाठपुराव्यामुळे पूर्ण झाला आहे. राज्य आणि केंद्र सरकारने हिंगोली नगर पालिकेला कोट्यावधी रूपयांचा निधी दिला. केंद्रात आणि राज्यात आपलेच सरकार असल्यामुळे यापुढेही निधी कमी पडू दिला जाणार नाही. शहराच्या विकासासाठी भाजप नेहमीच पुढाकार घेत आहे. आगामी नगर पालिका निवडणुकीसाठी इच्छुक उमेवारांनी त्यांच्या प्रभागात घरोघरी जाऊन भाजपने केलेल्या विकास कामांची माहीती देणे गरजेचे आहे. गोरगरीबांना घरकुलासह अनेक योजना भाजपच्या काळात मिळाल्या याची माहीती मतदारांना द्या. त्यांना विश्वासात घ्या, अफवांवर विश्वास न ठेवता प्रभागात काम करण्याचा सल्लाही यावेळी आ. मुटकुळे यांनी दिला.

यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी जिल्ह्यातील तीनही नगर पालिकेवर भाजपची सत्ता आणण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काम करावे असे आवाहन केले.

वसमत येथील आदीती लॉनमध्ये नगर पालिका निवडणुकीसंदर्भात भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक घेण्यात आली तर कळमनुरी येथील शासकीय विश्रामगृहात देखील आगामी नगर पालिका निवडणुकीसंदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी कळमनुरी नगर पालिकेवर भाजपचा झेंडा फडकावण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जय्यत तयारीला लागावे. राज्यात आणि केंद्रात आपली सत्ता असल्यामुळे निधीची कमतरता पडू देणार नाही असे आश्वासन दिले.

# भाजपच्या ओबीसी मोर्चा जिल्हाकार्यकारणीची निवड

## जिल्हाध्यक्षपदी शशीकांत वडकुते यांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ आक्टोबर**

हिंगोली भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी मोर्चाची जिल्हाकार्यकारणीची निवड रविवारी करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. गजाननराव घुगे, आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर सरचिटणीस उमेश नागरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांनी नियुक्तीपत्रे देऊन सत्कार केला.

येथील आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या निवासस्थानी आज भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते यांची प्रमुख उपस्थिती होती. ओबीसी मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी शशीकांत वडकुते यांची निवड करण्यात आली तर सरचिटणीसपदी पांडुरंग इमडे, रंगनाथ देशमुख, शंकरराव मुधळकर, उपाध्यक्षपदी कृष्णकांत शेवाळकर, प्रकाश राठोड, विठ्ठल सांगळे, गजानन सातव, प्रदीप कवडे, निरंजन नागरे, संतोष कुरवाडे, चिटणीसपदी गजानन चौंडेकर, संदीप कुंदर्गे, नारायण गादेकर, गुलाबराव गडदे, वामनराव पोले, बालाजी कासार, राधेशाम पोले, गोपाल मस्के, संजय शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. कोषाध्यक्षपदी माधव पौळ, ओबीसी महिला मोर्चा महिला ग्रामीण अध्यक्षपदी रेखाताई जहीरव, शहर अध्यक्षपदी वंदना गायकवाड, ओबीसी युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी लखन गोरे, सोशल मिडीया प्रमुखपदी अरविंद घुगे यांची निवड करण्यात आली.

या कार्यकारणीत जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांना स्थान देण्यात आले आहे. निवडीनंतर मान्यवरांच्याहस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले तसेच त्यांचा सत्कारही करण्यात आला.

# हिंगोली जिल्ह्याची सरासरी नजरी पैसेवारी ४५.८८ पैसे अतिवृष्टीमुळे पिकांना फटका बसल्याचे स्पष्ट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ आक्टोबर**

हिंगोली जिल्ह्याची सरासरी नजरी पैसेवारी ४५.८८ पैसे जाहीर झाली आहे. यामध्ये सर्वात कमी पैसेवारी कळमनुरी तालुक्यात ४३.९६ पैसे आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पिकांना अतिवृष्टीचा फटका बसल्याचे स्पष्ट झाले आहे. आता अंतिम पैसेवारीकडे शेतकऱ्यांचे लख लागले आहे.

हिंगोली जिल्ह्यात यावर्षी ३.७० लाख हेक्टर क्षेत्रावर खरीप हंगामाची पेरणी झाली आहे. यामध्ये प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, तुर, हळद या प्रमुख पिकांचा समावेश आहे. जून महिन्यात पिकांची लागवड झाल्यानंतर हंगाम चांगला येईल अशी अपेक्षा होती. मात्र त्यानंतर सतत झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांना चांगलाच फटका बसला आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीमुळे शेतकरी अडचणीत सापडला.

जिल्ह्यातील नजरी पैसेवारी किती येणार याकडे शेतकऱ्याचे लक्ष लागले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पाचही तालुक्यांची नजरी पैसेवारी जाहीर केली आहे. यामध्ये जिल्हयाची सरासरी पैसेवारी ४५.८८ पैसे आली आहे. यामध्ये हिंगोली तालुक्याची पैसेवारी ४५ पैसे, सेनगाव ४५.४७ पैसे, कळमनुरी ४३.९६ पैसे, वसमत ४८ पैसे तर औंढा नागनाथ ४७ पैसे एवढी आली आहे. सदर पैसेवारी ५० पैसे पेक्षा कमी आल्यामुळे जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पिकांना फटका बसल्याचे स्पष्ट झाले आहे. यासंदर्भातील अहवाल जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत शासनाकडे पाठविला आहे. त्यानंतर आता सुधारीत व अंतिम पैसेवारीकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. अंतिम पैसेवारी दि १५ डिसेंबरला जाहीर केली जाणार आहे.




**हिंगोली- येथील भाजपच्या आढावा बैठकीत शेख अतीक पहेलवान यांच्यासह त्यांच्या समर्थकांनी रविवारी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी त्यांचा सत्कार करतांना आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, सरचिटणीस उमेश नागरे, श्रीरंग राठोड, मनोज शर्मा आदींची उपस्थिती होती. यावेळी जाफरखान, अमजद खान, शेख पाशा शेख अकीब, शेख उबेद शेख फैसान यांनी प्रवेश केला. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### कळमनुरी नगर पालिका स्वबळावर लढा- गजाननराव घुगे

हिंगोली- आगामी नगर पालिका निवडणुकीत युती किंवा न होवो भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वबळावर निवडणुका लढण्याची तयारी ठेवावी, आम्ही कुठेही कमी पडणार नाही. कळमनुरी शहराचा विकास फक्त भाजपा करणार असा विश्वास भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी भाजपच्या आढावा बैठकीत व्यक्त केला. नगरपरिषद निवडणूक संदर्भात शासकीय विश्रामगृह येथे रविवारी भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत आमदार श्री तानाजीराव मुटकुळे, माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, ओबीसीचे जिल्हाध्यक्ष शशिकांत वडकुते, सरचिटणीस उमेश नागरे, मराठवाडा उद्योग आघाडीचे संजय कावडे, डॉ प्रकाश नाईक, दिनकर कोकरे विठ्ठल भोयर, मनोज देशमुख, सतिष कुलकर्णी, नंदु सोनटक्के, रवी सुर्यवंशी तसेच कळमनुरी मंडळाचे अध्यक्ष ओमकार नावडे, जेष्ठ नेते ओमप्रकाश मेने, भागवत ठाकुर, अशोक संगेकर, उमेश सोमानी भैय्याजी दरक, बाळु घुसे, नारायण डुरे, बबन आप्पा पचंलिगे, वैद्य, विलास भोसकर, नंदु मणियार, गोविंद मणियार शेभु कावडे, राजु जाधव, विक्रम शिंदे, हरिष भोसले व महीला अध्यक्ष खंदारे, संजय पाटील, अनिल इंगळे, योगेश सगेंकर विकास ठाकुर, पारस माडंवगडे सर्व भारतीय जनता पार्टी चे नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

### आदर्शमध्ये पदवी प्रदान सोहळा संपन्न



हिंगोली- येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि आदर्श महाविद्याल हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी पदवी वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद येथील प्राचार्य प्रो. डॉ. कमलाकर कणसे यांची उपस्थिती होती. सोबत मंचावर परीक्षा प्रमुख प्रा. डॉ. सत्यजित चव्हाण उपस्थिती होते. तसेच याप्रसंगी उपप्राचार्य (क.म.) प्रा. डॉ. सुरेंद्र साहू, पर्यवेक्षक प्रा. धनंजय जोशी, स्टाफ सचिव सचिन हाटकर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. सचिन पत्की, पीएम-उषा नोडल अधिकारी प्रा. अमजदखान पठाण यांची उपस्थिती होती. विद्यापीठ स्तरावर पदवी प्राप्त आदर्श महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा गुण गौरव करून त्यांना पदवी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

# काँग्रेसचे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांचा १४ आक्टोबरला शिवसेनेत प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ आक्टोबर**

काँग्रेसचे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांचा दि १४ आक्टोबरला मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शिवसेनेत प्रवेश होणार असल्याची माहीती पत्रकार परिषदेत माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी दिली.

मागील काही महिन्यांपासून माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या विविध पक्षातील प्रवेशाच्या शक्यतांना आता पूर्णविराम मिळाला आहे. हिंगोली विधानसभेचे तब्बल तीनवेळा आमदार म्हणून कार्यकाळ पार पाडलेल्या भाऊराव पाटील गोरेगावकर यांना विधानसभा निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. ऐनवेळी हिंगोलीची पारंपारीक जागा महाआघाडीने उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला दिली. त्यानंतर कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी अपक्ष निवडणुक लढवली होती. निवडणुकीनंतर येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांचा राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश होणार असल्याची जोरदार चर्चा सुरू होती. परंतु गेल्या काही दिवसात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असलेले प्रकाश थोरात, अनिल पतंगे व इतर मंडळीकडून गोरेगावकर यांना विरोध होत असल्याची चर्चा होती.

दोन दिवसांपूर्वी शिवसेना आ. संतोष बांगर यांनी माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. त्यानंतर शिवसेनेत प्रवेश होणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. या पार्श्वभूमीवर माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी आज गोरेगाव येथे त्यांच्या समर्थकांची बैठक घेऊन प्रवेशाच्या बाबतीत चर्चा केली. अखेर चर्चेनंतर पत्रकार परिषद घेत दि १४ आक्टोबर रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मुंबई येथे प्रवेश घेणार असल्याची घोषणा केली.

यावेळी पत्रकारांशी बोलतांना कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेतल्यानंतर आपण हा पक्ष प्रवेशाचा निर्णय घेतला आहे. आगामी नगर पालिका, जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकविणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# जिल्हाधिकाऱ्यांची गुगुळपिंप्री शाळेला भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ आक्टोबर**

निपूण हिंगोली उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी शनिवारी गुगुळ पिंप्री येथील जिल्हा परिषदे शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी स्वत: विद्यार्थ्यांना अध्यापन करीत त्यांच्याशी संवाद साधला.

जिल्हाधिकारी गुप्ता यांनी शाळेचा परिसर, वर्गखोल्या तसेच शैक्षणिक साधनसामुग्री आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची पाहणी केली. त्यानंतर विद्यार्थ्यांना अध्यापन करीत गणित, इंग्रजी विषयाबाबत प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांनी गणित विषयाबाबत योग्य उत्तरे दिली मात्र इंग्रजीविषय थोडा कच्चा असल्याचे आढळून आले. यावेळी इंग्रजी विषयाकडे लक्ष देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी गुप्ता यांनी शिक्षकांना दिल्या तसेच समाधान व्यक्त केले. यावेळी सरपंच नारायण खोडे, मुख्याध्यापक सुभाष पोहकर, शिक्षक रणबावळे, बोरकर, लहाने, डांगे, शिंदे, हनवते, अडबलवार, शामराव सुर्वे, पांडुरंग चोपडे, प्रफुल तायडे, आदींची उपस्थिती होती.

# शांताबाई दराडे विद्यालयाचा चेतन शेळके धावणे स्पर्धेत प्रथम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ आक्टोबर**

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथील चेतन शेळके या विद्यार्थ्याने क्रीडा स्पर्धेत यश संपादन केले आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय हिंगोली यांच्या वतीने घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत शाळेचा विद्यार्थी *चेतन सुभाष शेळके* यांनी १७ वर्षे वयोगटात ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावित यश संपादन केले. जवळा बाजार येथे संपन्न होणाऱ्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. शाळेच्या व संस्थेच्यावतीने मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ.प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक दत्तराज डोईफोडे, पर्यवेक्षक तथा क्रीडा शिक्षक अनिल लोळेवार, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# वसमत जवाहन कॉलनीत मोकाट कुत्र्यांचा चार चिमुकल्यांना यावा, नागरीक भयभीत



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १२ आक्टोबर**

शहरातील जवाहर कॉलनी परिसरात शनिवारी परिसरात खेळत असलेल्या चार निरागस चिमुकल्यांवर भटक्या कुत्र्यांच्या टोळक्याने अचानक हल्ला चढवून चावा घेतला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

साक्षीदारांच्या माहितीनुसार, चिमुकले नेहमीप्रमाणे अंगणासमोर खेळत होते. इतक्यात दोन ते तीन भटके कुत्रे धावत येत मुलांवर झडप घालून चावा घेत निघून गेले. मुलांच्या किंकाळ्यांनी संपूर्ण परिसर हादरला, स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमी मुलांना वाचवले आणि ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सर्व मुलांना रेबीज प्रतिबंधक लस दिली असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या काही दिवसांपासून या भागात भटक्या कुत्र्यांचा उच्छाद प्रचंड वाढला आहे. रात्रीच्या वेळी हे कुत्रे टोळक्याने फिरत असून, नागरिक व लहान मुलांसाठी धोका निर्माण झाला आहे. अनेकदा तक्रारी करूनही नगरपरिषदेच्या प्राणी नियंत्रण विभागाने अद्याप ठोस कारवाई केलेली नाही, अशी नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे. नगरपरिषदेने तातडीने कुत्र्यांचे बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत जयभवानीचा ४३ वा बॉयलर प्रदिपन समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१२ ऑक्टोबर**

जयभवानी सहकारी साखर कारखाना कार्यक्षेत्रात १३ ते १४ लाख मेट्रीक टन ऊस उपलब्ध आहे. त्यापैकी कार्यक्षेत्रातील १४६५६ हेक्टर क्षेत्राची नोंद कारखान्याकडे झालेली असून अंदाजे १० ते ११ लाख मेट्रिक टन ऊस गाळपास उपलब्ध होणार आहे. कारखान्याने चालू गळीत हंगामात ९ लाख मेट्रीक टन ऊस गाळपाचे व सरासरी ११ टक्के साखर उतार्याचे उदिष्ट ठरवीले असून कार्यक्षेत्रातील नोंदणी झालेल्या सर्व उसाचे शंबर टक्के गाळप करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत असे प्रतिपादन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी केले. २०२५-२६ च्या गळीत हंगामासाठी जयभवानी सहकारी कारखान्याचे बॉयलर प्रदिपन करताना ते बोलत होते.

जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२६ च्या ४३ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नि प्रदिपन समारंभ रविवार दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी श्रीक्षेत्र चाकरवाडी संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. महंत महादेव महाराज यांच्या हस्ते व कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा)पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, व्हा. चेअरमन भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, उपसभापती श्रीहरी पवार यांच्यासह संचालक सर्वश्री जगन्नाथ शिंदे, आप्पासाहेब गव्हाणे, सुनिल पाटील, श्रीराम आरगडे, राजेंद्र वारंगे, संदीपान दातखीळ, जगन्नाथ दिवाण, कुमारराव ढाकणे, शरद चव्हाण, भिमराव मोरे, रावसाहेब देशमुख, गणपत नाटकर, जगन्नाथ काळे, बाबुराव काकडे, रहेमतुल्ला पठाण, साहेबराव चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी ह.भ.प. महादेव महाराज आणि संचालक सुनील पाटील यांच्या हस्ते विधीवत पूजा करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बॉयलर प्रदिपन करण्यात आले. वेळेत बॉयलरचे काम पूर्ण केल्याबद्दल घनश्याम कादे यांना पाच हजार रुपयांचे



पारितोषिक चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी पुढे बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, गेवराई तालुक्यात पुरामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी मराठवाड्यातील सर्व नेत्यांना सोबत घेऊन प्रयत्न करत आहे. कारखान्याच्या माध्यमातून डिसलेरी ११ महिने कशी चालू ठेवता येईल यासाठी प्रयत्न चालू असून शेतकऱ्यांनी उसासोबतच आता फळबागा, रेशीम आधी उत्पादनाला हात घातला पाहिजे. रेशीमचे उत्पादन गेवराईत मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे रेशीमवर प्रक्रिया करणारा उद्योग सुरू करणार असल्याचे सांगून कारखान्यातील कर्मचारी आणि कामगारांनी अतिशय प्रामाणिकपणे काम केल्यामुळे जयभवानीची कार्यक्षमता वाढली आहे. त्यामुळे कामगारांच्या पगारात सप्टेंबर २०२५ पासून १५ टक्के वाढ करणार असल्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले. कुठल्याही गटातटाचा विचार न करता जयभवानीच्या कार्यक्षेत्रातील नोंद झालेल्या शेतकऱ्यांचा ऊस शंभर टक्के उचलला जाईल असे सांगून बँका, कारखाना, शिक्षणसंस्था यात कोणीही राजकारण करू नये असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

जयभवानीच्या साखरेची गोडी जगभरात पसरो- ह.भ.प. महादेव महाराज

याप्रसंगी शुभेच्छापर आशीर्वाद देताना ह. भ. प. महादेव महाराज म्हणाले की साधू संतांचे प्रेम आणि आशीर्वाद शिवाजीराव (दादा) पंडित परिवाराला मिळालेला आहे, दादांनी सामान्य माणसाला सामाजिक प्रतिष्ठा आणि प्रगती कशी मिळेल याचा विचार केला. एकमेका साहाय्य करू या सहकाराचा मंत्र प्रत्यक्षात आचरणात आणून जयभवानी साखर साखर कारखान्याची उभारणी केली. त्यामुळे अनेकांच्या घरात, शेतकऱ्यांच्या जीवनात प्रगती आली. सामान्य माणूस आज जयभवानीकडे सहकारी साखर कारखान्याकडे कामधेनू म्हणून पाहत आहे. सामाजिक कार्यात बरोबरच परमार्थिक काम करताना शिवछत्र परिवारांनी कधीही कुठेही दुजाभाव केला नाही. दादांची पुढची पिढी देखील दादांचा वारसा सक्षम पुणे पुढे घेऊन जात असताना समाजविधायक उपक्रम त्यांच्याकडून राबवले जात आहेत. जयभवानीच्या साखरेची गोडी जगभरात पसरो अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या.

# आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्याला यश

## शहरातील बायपास वळणावर दोन पुलांची बांधणी आणि स्लिप सर्विस रस्ता जोडणीच्या कामाला सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑक्टोबर**

बीड शहरातून जात असलेल्या आणि उत्तर दक्षिण जोडणारा धुळे सोलापुर महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. यात जड वाहतकीचे प्रमाण देखील जास्त असते. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बायपास रस्त्यावरील शहरात वळणावर नेहमी अपघात होत होते. यामुळे संभाव्य अपघात टळले पाहिजेत आणि नागरिकांचे जीव वाचले पाहिजेत त्यामुळे या वळणावर पुलांची बांधणी आणि स्लिप सर्विस रस्त्याची जोडणी अत्यंत महत्त्वाची होती.

त्या दोन्ही ठिकाणी पुलांची बांधणी व १२ किलोमीटर च्या रस्त्यावर स्लिप सर्व्हिस रस्ता जोडणीच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात झाली. या कामासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता.

बीड विधानसभेचे आ.संदीप भैया क्षीरसागर यांनी

या सुरू झालेल्या कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी कामासंदर्भात संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना करत व सुरू झालेले काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सूचना दिल्या.

आ.संदीप भैया आणि सय्यद सलीम यांनी खंडपीठात पिटीशन केली होती दाखल

आ.संदिप क्षीरसागर व माजी आमदार



सय्यद सलीम यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये यासंदर्भात पिटीशन दाखल केली होती.संदीप क्षीरसागर यांनी या कामाच्या मंजुरीची शिफारस राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी अशी वारंवार मागणी केली होती.तसेच माजी आ.सय्यद सलीम यांनी दोन्ही उड्डाणपूल आणि स्लिप सर्विस रोड मंजुरीसाठी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याचिका क्रमांक ११७६/२०२४ व पीटिशन क्रमांक ८८०८/२०२४ दाखल केली होती. याठिकाणी होत असलेले अपघात बघता आणि सुरक्षेच्या प्रश्नांची गंभीर दखल घेत डिसेंबर २०२४ मध्ये तिन्ही कामांना मंजुरी द्या असे निर्देश दिले होते.त्यांच्या या निर्णयाने बायपास वरील सुरक्षेचा प्रश्न मार्गी लागणार असून आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

# स्वा.सावरकर महाविद्यालयात भारतरत्न नानाजी देशमुख यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑक्टोबर**

स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना (छ.ड.ड.) युनिटतर्फे भारत रत्न चंडीकादास अमृतराव देशमुख उर्फ नानाजी देशमुख यांच्या जयंती निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन ११ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे होते. त्यांनी भारतरत्न नानाजी देशमुख, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ केला. या प्रसंगी डॉ. टी. पी. सोंडगे, डॉ. डी. बी. नागरगोजे (समन्वयक, लाइफलॉन्ग लर्निंग एज्युकेशन), प्रा. संजय काळे , तसेच रासेयो कार्यक्रमाधिकारी श्री. राजपाल जाधव, श्री. राम गव्हाणे आणि प्रा. सौ. दीपा देशपांडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये दुपारी १२:३० वाजता करण्यात आले होते. या प्रसंगी प्राचार्य प्रा. डॉ. सुहास मोराळे यांनी आपल्या भाषणात भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या प्रेरणादायी जीवनाचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या समाजसेवा, ग्रामीण विकास, शिक्षण आणि राष्ट्र निर्माणातील बहुमोल योगदानावर प्रकाश टाकला.आपल्या भाषणात प्राचार्यांनी सांगितले की, नानाजी देशमुख हे खरे अर्थाने समाजकारणी, शिक्षणप्रेमी आणि राष्ट्रसेवक होते. त्यांनी भारतीय जनता संघाच्या सामाजिक शाखेची स्थापना करून समाजातील वंचित घटकांसाठी कार्य केले. दीनदयाळ रिसर्च इन्स्टिट्यूट स्थापन करून ग्रामीण स्वावलंबन, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी आदर्श निर्माण केला. त्यांनी आदिवासी कल्याण, महिलांचे सशक्तीकरण आणि ग्रामविकासासाठी अनेक योजना राबवल्या. ग्रामीण युवकांना



व्यावसायिक आणि पारंपरिक शिक्षणाद्वारे स्वावलंबी बनविण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. नानाजी देशमुख यांनी राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक मूल्यांचे जतन आणि अखंड मानवतावाद या विचारसरणीचा प्रसार करून राष्ट्रनिर्मितीत मोलाची भर घातली. त्यांच्या कार्यामुळे ते केवळ राजकारणी नव्हते तर खरे राष्ट्रपुरुष आणि प्रेरणास्थान ठरले. आभार प्रा. संजय काळे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# जबरी चोरी करणारा आरोपी गजाआड स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑक्टोबर**

मागील दिड महिन्याखाली पाचेंगाव परीसरात शेतामध्ये वस्तीवर राहणाऱ्या शेतकरी कुटंबीयास अज्ञात चोरटयाने त्याचे गळयातील सोन्याचे दागीणे बळजबरीने हिसकावुन घेवुन पळुन गेले होते त्यावरुन पोलीस ठाणे गेवराई येथे गु.र.नं ५००/२०२५ कलम ३०४,३०९ (४), ३ (५) बी.एन.एस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. मा. पोलीस अधीक्षक बीड यांनी बीड जिल्हयामध्ये मालमत्तेचे गुन्हे करणाऱ्या ईसमांची माहीती काढुन कारवाई करण्याचे आदेशित केल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्या ष्टीने प्रयत्न सुरु केले होते.

दिनांक ११.१०.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्तबातमीदारामार्फत माहीती मिळाली की, बोराडे फारम भोसले व त्याचे साथीदाराने सदरील शेतकरी कुटुंबीयास लुटले असुन तो सध्या गेवराई येथे जातेगांव फाटयावर थांबलेला आहे. लागलीच पथक रवाना होवुन त्यास पकडले व त्याचे कडे गुन्हयामध्ये चोरीस गेलेला सोन्याचा मुद्देमाल गळयातील सोन्याची कंटी व डोरले मिळुन आला. त्याचे कडे मिळुन आलेल्या सोन्या बाबत चौकशी करता त्याने सदरील सोने पाचेगांव शिवारातुन वस्तीवर राहणाऱ्या शेतकऱ्यांचे लुटले असल्याचे कबुल केले आहे.

वरील गुन्हयात एक आरोपी निष्पन्न झाला आहे. आरोपी व मुद्देमाल पुढील गुन्हयाचा तपास कामी पोलीस हवालदार पिंपळे पोलीस ठाणे गेवराई यांचे ताब्यात देण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी यश आले आहे.

सदरील कामगिरी श्री नवनित कॉंवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार विकास राठोड, अंकुश वरपे, राहुल शींदे, दिपक खांडेकर, आश्पाक सय्यद, मनोज परजणे, विकी सुरवसे, चालक पोलीस हवालदार नितीन वडमारे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी मिळुन केली आहे.

# भारतरत्न नानाजी देशमुख यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑक्टोबर**

दीनदयाल शोध संस्थान संचलित नानाजी देशमुख विद्यामंदिर गोकुळ शिशु वाटिका व जन शिक्षण संस्थान बीड येथे भारतरत्न श्रद्धेय नानाजी देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम नानाजी देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले .यावेळी मंचावर अँड .अर्चना ताई तुंगार, डॉ.प्रदीपकुमार उजागरे ,गंगाधर जी देशमुख ,सुनंदा ताई कुलकर्णी ,रवी काका देशमुख ,अर्चना ताई मोराळे ,आरती ताई जोशी उपस्थित होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीनदयाल शोध संस्थांचे ग्रामोदय गीत, हर हाथ मे होगा काम हे गीत विद्यार्थिनींनी सादर केले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक मध्ये मोराळे ताईंनी नानाजी देशमुख यांची माहिती सांगितली.

त्यानंतर श्रावणी शिरसट ,अनय मोहोळकर , वेद घोडके, राघव कदम, अथर्व गुळवे, पूजा घुमरे, शिवम भगत, आर्यन पौळ, अंश पडवळकर, शिवांश लोखंडे, सरस्वती रामदासी,श्रिया आधापुरे, स्वरांजली तकिक, विराज आमटे, मयुरेश शिंदे ,तनूष कुलकर्णी , सई सावरे, म्रुणाल पवार ,पूजा घुम्बरे ,अरहा मोहोळकर , अनय मोहोळकर,या विद्यार्थांनी भाषणे केली .उजगरे सरांनी आपल्या मार्गदर्शनात नानाजी देशमुख यांच्या कार्याची माहिती सांगितली .कमवा व शिका या योजने ची माहिती सांगितली नानाजी यांनी मूल्य शिक्षण क्रूषी विकास ,ग्राम विकास या योजनेची माहिती सांगितली .रवी काका यांनी सांगितले की सुरुवातीला नानाजी देशमुख यांनी बीड जिल्हात ६ते १४वयोगटातील विद्यार्थांचा कार्यक्रम घेतला .डोंबरी चे गुरुकुल लोकाना कसे उपयोगी होईल यासाठी प्रयत्न केले .

गंगाधर देशमुख यांनी आपल्या भाषणात सांगितले की नानाजींचे एक चांगले उदाहरण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे ते म्हणजे नानाजी लिहीत असताना अगदी सरळ रेषेमध्ये लिहीत होते हा आदर्श विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे.देशमुख सरांनी सांगितले की नानाजी सरळ रेषेत लिहीत . त्यांनी बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यात डोंगरी येथे सुंदर मध्ये धन्ता अभियान राबवले . महाराष्ट्र शासनाने नानाजींच्या अडीच एकर व दीड एकर मॉडेल चे आदर्श घेऊन नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना सुरू केली

.सुनंदा कुलकर्णी यांनी सांगितले की नानाजी नी संपूर्ण आयुष्य समाजासाठी घालवले , ते एक बहुआयामी व्यक्तिमत्व होते .


शाळेतील चित्रकला शिक्षिका संजना ताई वडतीले यांनी नानाजींची प्रतिमा स्वहस्ते काढली, त्या प्रतिमेचे विमोचन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्ष समारोपात अर्चना तुंगार यांनी , नानाजी सर्वांशी सहज संपर्क कसे करत होते याविषयी अनुभव सांगितले. तसेच ग्रामोदय गीतातील हर हात मे होगा काम याविषयी नानाजींनी कौशल्य विषयक केलेले कार्य सांगून जन शिक्षण संस्थान हे कौशल्याचेच काम करत आहे असे सांगितले.प्रार्थनेने या कार्यक्रमाची सांगता झाली .

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती देशपांडे ,आभार आरती जोशी यांनी मानले .या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी व जनशिक्षण संस्थांचे सर्व अधिकारी कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# हिवाळी अधिवेशनात रोहिणी आयोग लागू करावा मागणीसाठी आवाज उठवणार-आमदार संजय केनेकर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१२ ऑक्टोबर**

मायक्रो ओबीसी वर अन्याय झाला तर २४ तास हा संजय केनेकर आपल्या साठी ए टी एम मशीन बनायला तयार आसुन येणाऱ्या हिवाळी अधिवेशनात रोहिणी आयोग लागू करावा या प्रमुख मागणी सह आपल्या समाजाच्या समस्ये वर आवाज उठवणार आहे असे अभिवचन विधान परिषदेतील आमदार संजय केनेकर यांनी काढले.



भीमराव जगन्नाथ दळे (प्रदेशाध्यक्ष, अखिल भारतीय बलुतेदार-अलुतेदार विकास परिषद यांच्या पुढाकाराने आंबेजोगाई शहरात आयोजित करण्यात आलेल्या मायक्रो ओबीसी चिंतन शिबिरा मध्ये आ. केनेकर हे बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेजोगाई नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर पापा मोदी यांची उपस्थिती होती तर प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगेबाबा महाराज यांचे वंशज प्रवीण जी जानोरकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिनजी साठे, शशिकांत आमणे (संस्थापक अध्यक्ष, बलुतेदार-अलुतेदार संघ.), जानकीराम पांडे (प्रदेशाध्यक्ष, बेलदार समाज संघटना.) यांचे ही मार्गदर्शन लाभणार आहे, बालाजी सिंगे, प्रशांत डोरले, दिलीप सोनवणे, विलास जावळे, कैलास गोसावी, रामेश्वर शिंदे, विजय पोहनेरकर, शुभम डहाके, अनंत उमाटे, विजय देवडे, भुमन्ना अक्केमवाड, मुकेश शिवगण, सुरेश धोत्रे, कैलास गोसावी, अतुल लोहार, सुदर्शन बोराडे, संध्या राजपूत, संजय जोरले कलीम जहांगीर, लक्ष्मण पाटोळे, राजेश पंडित, अक्षय शिंदे यांची प्रमुख उवस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. संजय केणेकर म्हणाले की, फुले शाहू आंबेडकर हे महामानव आमचे दैवत आहे त्यामुळे यांच्या मागे जाणारा समाज हा मायक्रो ओबीसी समाज आहे. तरीही मायक्रो ओबीसी समाजाची किती तरी दिवसा पासून फुले शाहू आंबेडकर यांच्या नावाने आमची बोळवन सुरु आहे. एकाही गोष्टीची मालकी नसलेला, स्वतःच्या संस्था नसलेला समाज म्हणजे मायक्रो ओबीसी समाज. खऱ्या अर्थाने दिन दलित उपेक्षित मायक्रो ओबीसी मधेच सापडतो.

मी माझी जात कधी लपवली नाही. माझ्या व्यथा याच माझ्या समाजाच्या आहेत, बारा बलुतेदारांच्या आहेत. मी मायक्रो ओबीसी समाजाचा असताना मुख्यमंत्री मा ना देवेंद्रजी फडणवीस यांनी मला ताकत दिली.

धर्म संस्कृतीचा राष्ट्राचा कणा आहे. मायक्रो ओबीसी समाजातील लोकांवर पावलो पावली अन्याय अत्याचार होतो आहे. गोवंश साठी लढणारा न्हावी समाचा पोरगा आज जेल मध्ये आहे. गुरव समाजाच पोरग मारलं गेलं. आज राज्यकर्त्याला डोके जास्त असणारा समाज चालतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब ज्या वेळी संभाजी नगर मध्ये आले त्यावेळी मी आपले दुखणे त्यांच्या कानावर घातल्या मुळे त्यांनी आपल्या भाषणात छोटे छोटे पिछडे जातीयों को ताकत देना है असे जाहीर वक्तव्य केले.

आपल्या लढ्यातून रोहिणी आयोग तर करुचं करू मात्र ज्या काही शासनाच्या कमीट्या आहेत यात आज पर्यंत मायक्रो ओबीसीच्या व्यक्तींना संधी मिळत नव्हती. मात्र या पुढे आशा कमीट्या मध्ये मायक्रो ओबीसीला चेअरमन, सदस्य या पदाचा वाटा दयावाच लागेल.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेश पंडित तर सूत्रसंचालन तुकाराम सुवर्णकार यांनी तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश वेदपाठक, संजय तेलंग, सय्यद अमजत भाई, शेख नासिर भाई, महेश वेदपाठक, बबन जंगले, रमाकांत सुवर्णकार, मुनवर भाई बागवान, ज्ञानेश्वर पोतदार आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले

# ज्ञान आणि कल्पकतेचा संगम - गुरुकृपा महाविद्यालयात राज्यस्तरीय भित्तीपत्रक सादरीकरण स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑक्टोबर**

फार्मसी विद्याशाखेमध्ये लोकप्रिय असलेल्या राज्यस्तरीय भित्तीपत्रक सादरीकरण (पोस्टर प्रेझेंटेशन) स्पर्धेचे आयोजन गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव महाविद्यालयात भव्य स्वरूपात करण्यात आले. या वेळी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील फार्मसी कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला.



सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन गुरुकृपा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनी केले या कार्यक्रमासाठी ग्लेनमार्क फार्मास्युटिकल या नामांकित औषधी कंपनीचे मुख्य संशोधक वैज्ञानिक श्री अलकेश कासलीवाल यांची खास प्रमुख उपस्थिती लाभली. भित्तीपत्रकाचे निरीक्षणे संपल्यानंतर येथे पारितोषिक वितरण समारंभ पार पडला यात डीफॉर्मसी आणि बीफार्मसी विभागात स्वतंत्र पाच हजार, तीन हजार, दोन हजार रोख व सन्मानचिन्ह बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुरुकृपाचे प्राचार्य अमित बिंदू यांनी केले तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनी मंचावरून सहभागी विद्यार्थ्यांशी संवाद साधला यावेळी पुरुषोत्तम करवा, सुभाष नाकलगावकर, हरीश यादव आदी पत्रकार उपस्थित होते.

# खा. अशोक चव्हाणांनी वाळकीच्या मेळाव्यातून फुंकले निवडणुकीचे रणशिंग

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. १२ ऑक्टोबर-**

विधानसभेत नव्याने काम करणारे तरुण नेतृत्व पुढे येत आहे. भारतीय जनता पक्षाची ताकद वाढवायची असेल तर तरुण नेतृत्वाला संधी देऊन यावेळी नवी क्रांती घडवून आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकवणार. असे प्रतिपादन राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी वाळकी (बु.) येथील भारतीय जनता पार्टी हदगाव पूर्व मंडळाचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी आयोजित केलेल्या कार्यकर्ता पदाधिकारी मेळाव्यात बोलताना आपले व्यक्त केले.

हदगांव विधानसभा क्षेत्रात राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या झंझावती दौऱ्यामुळे भाजपा कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यात उत्साह संचारला आहे. यावेळी प्रमुख पाहुणे उमरखेडचे आमदार किसनराव वानखेडे, किनवटचे आमदार भीमराव केराम, माजी आमदार तथा शहर जिल्हाध्यक्ष अमरनाथ राजूरकर, नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती संजय लहानकर, किशोर स्वामी, रामचंद्र मुसळे, जगदीश पाटील भोशीकर, प्रा. राजीव सूर्यवंशी, शेखर पाटील कोळीकर, हदगाव पश्चिम मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत हनवते, तालुका अध्यक्ष बाला पाटील, माजी तालुकाध्यक्ष तातेराव वाकोडे, गजानन चायल, बाळू देशमुख, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष ममता जोशी, जिल्हा सरचिटणीस सुप्रिया मुनेश्वर, आयोजक तथा भाजपचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर आदी होते. पुढे बोलताना अशोकराव चव्हाण म्हणाले, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सर्वांगीण विकासाची जबरदस्त घोडदौड चालू आहे. त्यांचा विकसित भारत हा संकल्प आहे तर विकसित नांदेड जिल्हा हा माझा संकल्प असल्याचे सांगत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहन करीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे त्यांनी रणसिंग फुंकले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर हदगांव तालुक्यातील आष्टी जिल्हा परिषद गटातील



वाळकी (बु.) येथे भाजपाचे तालुका अध्यक्ष भागवत देवसरकर यांनी कार्यकर्ता मेळाव्याचे सुंदर आयोजन केले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी राज्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक योजना राबवत आहेत. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाच्या अनेक योजना पोहोचवण्याचे काम सुरळीत चालू आहे. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचे पॅकेज, अनुकंपाधारकाचे प्रश्न, रस्ते विकास असो की, जीएसटी दरांमध्ये केलेला बदल सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या ठरल्या आहेत. हदगाव तालुक्यात भागवत देवसरकर यांच्यासारखे उत्कृष्ट काम करणारे तरुण नेतृत्व पुढे येत आहे. तरुण नेतृत्वाला संधी देऊन मला यावेळी नवीन क्रांती घडवायची आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती बरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपचा झेंडा फडकवायचा आहे. त्यासाठी कार्यकर्त्यांनी कंबर कसून कामाला लागावे. अनेकांनी सांगितले की, अशोक चव्हाणांचे हदगाव तालुक्याकडे दुर्लक्ष होत आहे. पण आता मी हदगाव तालुक्यासाठी निश्चित वेळ देणार आहे. तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी मी बार बार हदगावला येणार. पण मला हदगावला येण्यासारखे मुद्द्याच काही करून दाखवा. मी निश्चित येणार, असे उद्गार काढताच उपस्थितातून जल्लोषपूर्ण टाळ्यांचा कडकडाट झाला. जनतेमध्ये राहणाऱ्या, त्यांचे काम करणाऱ्या कार्यकर्त्याला आपण यावेळी निश्चित संधी देऊ. हदगाव तालुक्यात तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांचे चांगले काम चालू आहे. आष्टी जिल्हा परिषद गटातील वाळकी (बु.) सारख्या छोट्या गावात रात्री उशिरापर्यंत हजारोंचा जनसमुदाय थांबलेला पाहून खासदार अशोक चव्हाण यांनी समाधान व्यक्त करीत आगामी जिल्हा परिषदसाठी देवसरकरांना ग्रीन सिग्नल दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ओम इंदेवार, देवानंद वानखेडे, स्वप्निल रामगिरवार, शशिकांत बंडावार, शेख रहीम, अविनाश कदम, प्रवीण जाधव, राजेंद्र मोरे, भीमराव पाटील चव्हाण, अरविंद हुंडेकर, गजानन चव्हाण, शंकर जगदाळे, बालाजी मेटेवाड, सुनील पाटील वाळकीकर, विशाल परभणकर, योगेश चव्हाण, शिवराज वारकड, संघपाल लोणे, धनराज सोनटक्के, संजय सोमेवाड, प्रकाश आडे, सतीश डोणगे यांच्यासह भारतीय जनता पार्टी हदगाव पूर्व मंडळातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, बुथप्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, कार्यकर्ते वाळकी (बु.) येथील ग्रामस्थानी परिश्रम घेतले.

**खा. अशोकराव चव्हाण यांचे आशीर्वाद हदगाव तालुक्यावर असावेत**

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र भाजपचा बोलबाला झाला पाहिजे, यासाठी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत वाळकी (बु.) येथे कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन केले. मेळाव्याच्या अनुषंगाने सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी एक भाजपचा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून आपण अनेक विकासाची कामे करण्याचा प्रयत्न करीत आहोत. यापुढेही करणार असल्याचे आणि राज्यात नवे नेतृत्व आणि क्रांती घडवून आणणाऱ्या खा. अशोकराव चव्हाण यांचे आशीर्वाद हदगाव तालुक्यावर असावेत. एवढाच माफक प्रयत्न असल्याचे भाजपाचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी प्रास्ताविकात मनोदय व्यक्त केला.

## प्रा. शंकर राठोड यांना पिएच. डी प्रदान

**बाऱ्हाळी-**नायगांव तालुक्यातील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित उच्च माध्यमिक ज्युनिअर कॉलेज चे शिक्षक शंकर नामदेव राठोड यांनी नुकतीच पि एच डी पदवी प्रदान केली आहे. मुखेड तालुक्यातील



मांजरी या गावचे रहिवासी असलेले व उच्च माध्यमिक ज्युनिअर कॉलेज मधील शिक्षक शंकर नामदेव राठोड यांनी आदिवासी बहुल भागात स्वतंत्र ग्रामपंचायत नसलेल्या तांड्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास: विशेष संदर्भ नांदेड जिल्हा. या विषयावर पंडित दीनदयाळ उपाध्याय महाविद्यालय देवणी येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दगडू नरसिंग दामावले यांच्या मार्गदर्शना खाली शोध प्रबंध सादर केला. त्यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथून पदवी प्रदान करण्यात आली. त्यावेळी संशोधक मार्गदर्शक आदरणीय डॉ .दगडू नर्सिंग दामावले. मौखिक परीक्षेसाठी अध्यक्ष म्हणून उपस्थित असलेले डॉ. प्रमोद लोणारकर उपस्थित होते. तर बहिस्थ परीक्षक म्हणून डॉ.नवनाथ शिंदे, हे उपस्थित होते. डॉ. संजय मारोतराव मुंडकर, डॉ. संतराम यांचीही उपस्थिती लाभली. या त्यांच्या यशा बद्दल बालक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रतन लक्ष्मण राठोड, सचिव बळीराम लक्ष्मण राठोड, माजी प्राचार्य तथा किशन रतन राठोड ,प्राचार्य विजय कुमार देशमुख कार्यवाहक तथा सरपंच मधुकर गोपीनाथ राठोड, शिक्षक आनंदराव सूर्यवंशी, सुभाष कदम सह आदींनी कर्मचारी वर्गांनीं त्यांचे अभिनंदन केले.

## राष्ट्रीय युवा शिक्षकरत्न पुरस्कारासाठी व्यंकट जाधव यांची निवड

**नायगाव -** नरसी येथील जि. प. के. प्रा. शाळेचे सुप्रसिद्ध शिक्षक व्यंकटराव जाधव यांची 'राष्ट्रीय युवा शिक्षकरत्न पुरस्कार २०२५' साठी निवड झाली आहे. ही निवड महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषद यांच्या वतीने करण्यात आली असून, जाधव यांच्या बहुआयामी



कार्याची दखल घेत या राष्ट्रीय सन्मानासाठी त्यांची निवड झाली आहे. दि. ११ ऑक्टोबर २०२५ रोजी नरसी येथील एका विशेष समारंभात शिक्षक संघटनेचे नेते व्यंकटराव जाधव यांच्या हस्ते निवडपत्र देऊन हा सन्मान जाहीर करण्यात आला. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक कपिलेश्वर नलबलवार, शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा मानाचा पुरस्कार २८ऑक्टोबर २०२५ रोजी रत्नागिरी येथील वि. दा. सावरकर नाट्यगृहात एका भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहे.

## पीएनजी ज्वेलर्स तर्फे दिवाळीनिमित्त विशेष फेस्टिव्ह ऑफर्स मोहीम

**नांदेड-**पीएनजी ज्वेलर्स ने आपल्या भव्य दिवाळी फेस्टिव ऑफर्स मोहिमेची घोषणा केली असून ही मोहिम २६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत चालणार आहे. या दरम्यान ग्राहकांना अत्यंत आकर्षक किमतीत उत्कृष्ट दागिने खरेदी करण्याची एक अनोखी संधी मिळणार आहे. या दिवाळी




मोहिमेअंतर्गत, ग्राहक सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर ५० टक्के पर्यंत सूट आणि हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर १०० टक्के पर्यंत सूट तसेच जुने सोने बदलताना ० (शून्य) टक्के कपात या खास ऑफर्सचा लाभ घेऊ शकतात. या ऑफर्स सर्व पीएनजी ज्वेलर्सच्या स्टोअर्समध्ये आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असतील, ज्यामुळे अतुलनीय कारागिरीचे काळातील दागिने घेऊन सणासुदीचा आनंद साजरा करू इच्छिणाऱ्या दागिन्यांच्या शौकिनांसाठी सुलभता आणि सोय सुनिश्चित होईल. या मोहिमेबद्दल बोलताना, पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले की , दिवाळी हा प्रकाश, समृद्धी आणि एकत्र येण्याचा सण आहे. पिढ्यानपिढ्या पीएनजी ज्वेलर्सवर विश्वास ठेवणाऱ्या आमच्या ग्राहकांसोबत हा सण साजरा करण्याची ही आमच्यासाठी नेहमीच एक खास संधी असते. आमचे दागिने अधिक सुलभ बनवून, उत्तम मूल्य प्रदान करत, सणाचा आनंद निर्माण करण्याचा आमचा मानस आहे. परंपरा, सौंदर्य आणि परवडणाऱ्या किमतींचा परिपूर्ण संगम अनुभवण्यासाठी आम्ही आमच्या दालनात ग्राहकांचे स्वागत करण्यास उत्सुक आहोत.

## मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे मानधन सुरू करण्यात बाळा पाटील यांना यश

**हदगाव -**मुख्यमंत्री लाडकी बहीण ही योजना फारच लोकप्रिय ठरली असून या योजनेअंतर्गत हदगाव शहरातील काही महिलांच्या कागदपत्रांअभावे अथवा काही तांत्रिक अडचणीमुळे म्हणा आवेदन देऊन देखीलही काही महिला पात्र ठरले नव्हते ही बाब भाजपा तालुका अध्यक्ष बाळा पाटील यांना कळताच त्यांनी त्यांचे आवेदन कागदपत्रांसह सहित भरून योजनेसाठी पात्र ठरविण्याकरिता पाठपुरावा केल्यामुळे हदगाव



शहरातील एकूण ६८० महिलांच्या खात्यात लाडकी बहीण योजनेचे अनुदान जमा झाले असून पात्र झालेल्या महिलांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नांदेडचे राज्यसभा खासदार तथा माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, भाजपाचे उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. किशोर देशमुख यांच्यासह भाजपा तालुका अध्यक्ष बाळा पाटील यांचे आभार मानले. कागदपत्रांना अभावी अथवा तांत्रिक अडचणीमुळे शहरातील काही महिला या योजनेचा लाभ घेऊ शकले नाही. या महिलांनी भाजपा तालुका अध्यक्ष बाळा पाटील यांच्या कानावर ही बाब टाकली त्यांनी त्यांचे कागदपत्र गोळा करत प्रत्येक वार्डात जाऊन या महिलांना धीर देत वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत एकूण ६८० महिलांना पात्र ठरवत त्यांच्या खात्यात एका महिन्याचे रक्कम जमा करण्यात यशस्वी झाले.

## ट्रामा केअर सेंटरसह इतर मागण्यांचे माजी मुख्यमंत्री चव्हाण यांना माजी नगरसेवक बावाणी यांचे निवेदन

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १२ ऑक्टोबर-**

माहूर शहर हे तालुक्याचे मुख्य ठिकाण तसेच राज्यातील देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी श्री रेणुका देवीचे एक प्रसिद्ध शक्तीपीठासह विविध धर्मीयांचे धार्मिक स्थळ आहे. त्यामुळे याठिकाणी दररोज हजारोंच्या संख्येने भाविक व नागरिक शहरात व शहराबाहेर आवागमन करतात. यावेळी अनेक वेळा वाहनांचे अपघाताच्या घटना घडतात. अशावेळी येथील ग्रामीण रुग्णालयाची सेवा मर्यादा अपुरी पडत असल्याने माहूर शहरात ट्रामा केअर सेंटर द्यावा यासह अद्यावत शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारावा आणि ब्रॉडगेज मेट्रो रेल्वे प्रकल्प आणावा, अशी मागणी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण हे माहूर येथे एका कार्यक्रमासंदर्भात आले असताना त्यांचेसह आ.भीमराव केराम यांचे कडे माजी नगरसेवक, पत्रकार इलियास बावाणी यांनी दि. ११ ऑक्टोबर रोजी निवेदन देऊन केली आहे.

माहूर शहरात मूलभूत सुविधा उभाराव्या यासाठी अनेक मान्यवरांनी याआधी पाठपुरावा केलेला आहे.स्थानिकांना रोजगार मिळावा, भाविकांना माहूर गडावर येण्यासाठी ब्रॉडगेज मेट्रो रेल्वेची जलद सुविधा मिळावी आणि अपघातग्रस्तांना माहूर शहरातच तात्काळ आरोग्य सुविधा मिळावी यासाठी ट्रामा केअर सेंटर मंजूर करून सुरू करावे यासाठी पत्रकार इलियास बावाणी यांचा अनेक वर्षापासून पाठपुरावा सुरू आहे.



माहूर तालुक्यातील शेती शिवार हे कोरडवाहू असल्याने उन्हाळ्यात शेतकरी शेतमजूर बेरोजगार रोजगारासाठी परप्रांतात जातात तालुक्यातील अर्धी अधिक खेडी ओस पडतात त्यामुळे मरावीम कंपनी कार्यालय, बस स्थानक आणि ग्रामीण रुग्णालयाच्या राष्ट्रीय महामार्गाला लागून असलेल्या जागेत शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारल्याने हजारोंना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल.तसेच माहुर गडावर येणाऱ्या भाविकांची संख्या लाखोच्या घरात गेल्याने त्यांना येण्या-जाण्यासाठी प्रचंड त्रास होत असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर ते यवतमाळ ब्रॉडगेज रेल्वे मंजूर केली आहे. ती माहूरपर्यंत वाढवावी जेणेकरून भाविकांना जलद गतीने येऊन दर्शन घेता येईल.तसेच तालुक्यातून राष्ट्रीय महामार्ग गेल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे त्यासाठी शासकीय नियमाप्रमाणे प्रत्येक ५० किलोमीटर अंतरावर ट्रामा केअर सेंटर मंजूर होत आहेत. त्याचधर्तीवर माहूर शहरातही पाच एकर जागा घेऊन ट्रामा केअर सेंटर उभारावे,अशी मागणी माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोकराव चव्हाण यांच्याकडे त्यांच्या माहूर भेटीदरम्यान केली आहे.माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी माहूरगडावर त्यांच्या कार्यकाळात अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

त्याचप्रमाणे या आवश्यक सुविधा सुद्धा उपलब्ध करून दिल्यास येथील नागरिक व येणाऱ्या भाविकांचा त्रास कमी होईल, स्थानिकांना रोजगार मिळेल आणि अपघातग्रस्तांना तात्काळ आरोग्य उपचार मिळतील अशा आशयाच्या

मागण्यांचे निवेदन माजी नगरसेवक पत्रकार इलियास बावाणी यांनी खा.चव्हाण यांना दिले आहे.

## कंधार तालुक्यात प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजनेचा शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. १२ ऑक्टोबर-**

तालुका कृषी अधिकारी प्रशांत कासराळे याच्या मार्गदर्शनाखाली व कंधारचे मंडळ कृषी अधिकारी बी.के.वाठोरे यांच्या सुचनेनुसार शनिवारी, ११ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता मौजे दैठणा ता.कंधार येथे प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र सरकारकडून प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजना जाहिर करण्यात आली आहे. या योजनेमध्ये कमी उत्पादकता असलेले, कमी सिंचन क्षमता असलेले, कृषी कर्जाच्या उपलब्धतेबाबत समस्या असलेल्या १०० जिल्ह्याची निवड केंद्र सरकारने केली आहे. यात नांदेड जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. कृषी उत्पादकतेत वाढ करणे, पीक विविधीकर, टिकाऊ कृषी पद्धतींना प्रोत्साहन देणे, पीक काढणीनंतरची साठवण क्षमता वाढवणे, विश्वासार्ह पाणी पुरवठ्यासाठी सिंचन पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे, शेतकऱ्यांची अल्प मुदतीच्या आणि दीर्घकालीन कृषी कर्जाच्या माध्यमातून कर्जाची पोहोच वाढवणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहेत.

यावेळी कुरुळ्याचे उपकृषी अधिकारी रघुनाथ नाईक व सहाय्यक कृषी अधिकारी संभाजी वडजे यांनी कृषी उत्पादकता वाढविणे, एक विविध आणि शाश्वत कृषी पद्धती स्वीकारणे, एक घनतेत वाढ, तालुकास्तरावर कापणी नंतरचे साठवण क्षमता वाढवणे याबाबत



शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. या योजनेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. हा कार्यक्रम शेतकऱ्यांना लाईव्ह दाखवण्यात आला.

यावेळी सरपंच प्रतिनिधी नामदेव तोंडे, उद्धव वसुरे, मारुती दैठणेकर, एकनाथ चोंडे, विलास दैठणेकर, मारुती केंद्रे, हरिकिशन आंनकडे, मुरलीधर भांगे, तुकाराम आनकाडे, महेश लवटे, माधव आनकाडे, संभाजी भंगे, पांडुरंग भंगे, बालाजी चोंडे, रामदास केंद्रे , संतोष आनकाडे, पुंडलिक आनकाडे यासह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

## मुदखेड शहरामध्ये मोकाट जनावरांचा सुळसुळाट

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १२ ऑक्टोबर-**

गेल्या काही दिवसांपासून भिमनगर परिसरात व मुदखेड शहरामध्ये मोकाट कुत्र्यांची संख्या खूप वाढली आहे. यामुळे स्थानिक नागरिकांना, विशेषत लहान मुलांना आणि वृद्धांना मोठा त्रास होत आहे.

मोकाट कुत्रे रस्त्याने ये-जा करणाऱ्या लोकांच्या मागे चावा घेण्यासाठी धावतात, ज्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. मोकाट जनावरे व कुत्रे रस्त्यांवर, सार्वजनिक ठिकाणी आणि कचरापेट्यांभोवती कचरा पसरवून अस्वच्छता निर्माण करीत आहेत. मोकाट कुत्र्यांच्या व इतर जनावरांच्या विष्ठेमुळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे आणि साथीचे रोग पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात



कुत्रे भुंकल्यामुळे शांततेचा भंग होतो आणि लोकांना झोप लागत नाही. काही कुत्र्यांनी नागरिकांना चावा घेतल्याच्या घटनाही घडल्या आहेत, ज्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या मोकाट फिरणाऱ्या जनावरांमुळे मोटार सायकल वाहनधारक असो की पायी चालणारा नागरिक असो त्यांच्या मध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या गंभीर समस्येवर नगर परिषदेने त्वरित तोडगा काढणे आवश्यक आहे. या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नगरपरिषदेने योग्य ती कारवाई करून मोकाट फिरणाऱ्या जनावरांचा बंदोबस्त करावा. या मागणीचे निवेदन कुणाल देविदास चौदंते यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी जगदिश दळवी यांना देण्यात आले आहे. यावेळी निवेदनकर्ते कुणाल चौदंते, सुरज चौदंते, रोहन कांबळे, यांची उपस्थीती होती.

## तामसा येथे रास्वसंघाचे पथसंचलन

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. १२ ऑक्टोबर-**

तामसा येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापना शताब्दी वर्षानिमित्त पथसंचलन व विजयादशमी उत्सव दिनांक १२ रोजी रविवारी मोठ्या जल्लोषात संपन्न झाला.

तामसा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून पथसंचलनाला घोषपथकांसह सुरुवात झाली. जुने बसस्थानक, डॉ. हेडगेवार मार्केट, जुन्या शहरातील मिरवणूक मार्गावरून निघालेल्या पथसंचलनाचे शेकडो कुटुंबांनी घरासमोर रांगोळी काढून पुष्पवृष्टी करत स्वागत केले. बालाजी मंदिरात पथसंचलनाचा समारोप विजयादशमी उत्सवाने झाला. यावेळी जिल्हा कार्यवाह जगदीश तावडे, प्रमुख वक्ते कमलाकर दिक्कतवार, व्यापारी संघाचे अध्यक्ष विजयकुमार लाभसेटवार यांच्या हस्ते शस्त्रपूजन झाले. दिक्कतवार यांनी संघाचा स्थापनेसह शंभर वर्षाचा इतिहास व वाटचाल सांगून पंच परिवर्तनाच्या माध्यमातून देश व समाजात सकारात्मक परिवर्तन करण्यासाठी



संघ प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट केले. देशाला परम वैभवात नेण्याचे प्रयत्न संघ स्वयंसेवक विविध सेवा माध्यमांच्याद्वारे करीत असल्याचे दिक्कतवार यांनी सांगितले. पथसंचलनात अनेक कुटुंबातील स्वयंसेवकाच्या तीन पिढीची उपस्थिती होती. यावेळी जिल्हा बौद्धिकप्रमुख श्रीमंगले, राममंदिराचे पुजारी भानुदास महाराज, पंडितराव पाटील, ज्येष्ठ स्वयंसेवक भानुदास संगणवार, दीपक बंडेवार, ओंकार भद्रे,अमोल तामसेकर,महेश मठपती, बालाजीराव तगडपल्ले,भाजपाचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर आदींसह राष्ट्रसेविका समितीच्या महिलासह स्वयंसेवक उपस्थित होते.

## देवाच्या मंदिराप्रमाणे आरोग्य मंदिरही स्वच्छ ठेवण्याची काळजी घ्यावी : राजश्री पाटील

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १२ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत आरोग्य उपकेंद्र लोकार्पण सोहळा दिनांक १२ ऑक्टोंबर २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता भायेगाव येथे संपन्न झाला यावेळी गोदावरी समूहाच्या अध्यक्ष राजश्रीताई हेमंत पाटील यांनी यावेळी गावातील देवाचे मंदिर ज्याप्रमाणे स्वच्छ ठेवतो तसेच आरोग्य मंदिर ही स्वच्छ ठेवण्याची काळजी भायगाव येथील नागरिकांनी घ्यावी असे मत व्यक्त केले.

भायेगाव येथे आरोग्य मंदिराचा लोका पण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला यावेळी या लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटक म्हणून दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंडारकर बोलताना



म्हणाले की परिसरासाठी हे आरोग्य मंदिर परिसरात एक वैभव निर्माण झाले असल्याचे सांगितले तर यावेळी त्या कामाचे श्रेय बालाजी पाटील बाहेरगावकर यांना देत त्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले.तर याच वेळी पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या गोदावरी समूहाच्या अध्यक्षा राजश्रीताई हेमंत पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की असे सामाजिक कार्य करणारी कार्यकर्ते आपण जपली पाहिजे आणि त्यांना जगताही आले पाहिजे त्याचप्रमाणे या ठिकाणी आलेल्या रुग्णांना सेवा देणे हे डॉक्टर आमचे कर्तव्य आहे त्याचबरोबर आशाताई चे बरेच काही प्रश्न ते पण वैद्यकीय अधिकारी सोडवले पाहिजे या सर्व वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून गावकऱ्यांचे आरोग्यसेवा पूर्ण होईल असे मत मांडले यावेळी मंचावर दक्षिण मतदार संघाचे लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंडारकर, सौ सविता खोसडे सरपंच, विनय गिरडे, मनोहर पाटील शिंदे, उद्धव पाटील शिंदे, शिवाजी कदम, तुकाराम पवार, रावसाहेब महाराज, अशोक मोरे, सुहास पाटील खराने, सुहास पाटील वांगीकर, संभाजी जाधव, विलास पाटील इंगळे, बालाजी पाटील पुयड, बाळू पाटील मोरे, डॉ. सुनील राव देशमुख, डॉ. महादाजी बागल यांची उपस्थिती होती .तर या लोकार्पण सोहळ्यास आरोग्य विभागाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण मुंडे, डॉ. बालाजी राठोड, डॉ. गजानन गुडपे, डॉ. लता मुदीराज, डॉ. हसन शेख , नारायण देशमुख, संभाजी पोवाडा, रामराव कोल्हे, श्रीराम खोसडे, शंकर कोल्हे, नागोराव कोल्हे, उर्मिला खोसडे, आनंदा मेकाले, गौतम भालेराव, पांडुरंग कोचार, दत्तराम गोडसे, गोविंद कोल्हे , विठलराव खोसडे, राजू वडवळे, रवी किरकन ,गोविंद तेलंगे, ग्रामविकास अधिकारी वाकोरे, राठोड सर, शैलेश वाघमारे, मुमताज शेख, मायादेवी चव्हाण,

यादवराव इंदुरकर, सीमा कदम, नामदे पुयड ,आनंदा मांजरे, शिवानंद खोसडे, गंगाधर कोल्हे, ज्ञानेश्वर कोल्हे, बापूराव कोचार, शंकर कोल्हे, शिवाजी कोचावर, चंदर कोल्हे, शंकर कोल्हे यांच्या परिसरातील गावकऱ्यांची व नागरिकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भायेगाल नगरीचे सरपंच प्रतिनिधी बालाजी पाटील भायेगावकर यांनी केले.तर आभार प्रदर्शन प्रल्हाद पाटील यांनी केले.तर सुत्रसंचलन बालाजी कोल्हे यांनी केले.